रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २९३
www.ramprahar.com

◆ मंगळवार, १२ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

म्हसळा नगराध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा/२
खारआंबोली कालव्याच्या कामाने घेतली गती/५
पै. अन्वर बुराण स्मृतीचषक क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ/८

## आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये वाढ




**मुंबई** : महाराष्ट्र राज्य शासनाने केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. शासनाने आयएएस, आयपीएस आणि आयएफएस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये दोन टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. पूर्वी कर्मचाऱ्यांना ५८ टक्के महागाई भत्ता मिळत होता. आता तो येथून पुढे ६० टक्के इतका होईल. सामान्य प्रशासन विभागाने सोमवारी (दि.११) या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय (जीआर) काढला आहे. ही वाढ १ जानेवारी २०२६पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली आहे. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने २२ एप्रिल २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने हे आदेश लागू केले आहेत.

# रायगडातील एसआयआर मॅपिंगचा आढावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्रात मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) राबविण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील राबविण्यात येत असलेल्या एसआयआरच्या पूर्वतयारीची माहिती घेण्यासाठी सोमवारी (दि. ११) जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, माजी खासदार किरीट सोमय्या, धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, रायगड जिल्हा परिषदेचे कृषी सभापती वैकुंठ पाटील, पनवेल विधानसभा क्षेत्र बीएलए-१ प्रमुख व नगरसेवक परेश ठाकूर आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय मतदारांच्या २००२च्या मतदार यादीतील माहितीसोबत करण्यात आलेल्या मॅपिंगची माहिती मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी बैठकीत दिली.

जिल्ह्यात पनवेल, कर्जत, उरण, पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड हे सात विधानसभा मतदारसंघ आहेत. जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघात ६०.८४ टक्के मतदारांचे मॅपिंग करण्यात आले असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.



## इर्शाळवाडीत ट्रेकदरम्यान युवकाचा दुर्दैवी मृत्यू

**चौक, खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील प्रसिद्ध ट्रेकिंग स्थळ असलेल्या इर्शाळवाडी येथे सोमवारी (दि.११) घडलेल्या दुर्दैवी घटनेत डोंबिवली येथील एका २० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला आहे. ट्रेकिंगसाठी आलेल्या पाच मित्रांच्या समूहातील हा युवक अचानक अस्वस्थ झाल्यानंतर बेशुद्ध पडला होता. स्थानिक ग्रामस्थ, पोलीस आणि वैद्यकीय यंत्रणेच्या तत्परतेने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

डोंबिवली येथील साहिल सुर्वे (२०), युवराज चव्हाण (२०), मितेश गुप्ता (२०), देवेश गुप्ता (२०), क्रिश शेट्टी (२०) आणि रितेश कोणका (२०) हे मित्र इर्शाळवाडी परिसरात ट्रेकिंगसाठी आले होते. ट्रेकदरम्यान रितेशला अचानक त्रास जाणवू लागला. त्याच्या मित्रांनी त्याला सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र काही वेळातच तो बेशुद्ध पडला. या घटनेनंतर त्यापैकी दोन युवकांनी तातडीने इर्शाळवाडीच्या पायथ्याशी येऊन ग्रामस्थांना माहिती दिली.

स्थानिक ग्रामस्थांनी त्वरित घटनास्थळी धाव घेत युवकाला मदत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. खालापूर पोलीस ठाण्यालाही या घटनेची माहिती देण्यात आली होती, तर ग्रामस्थांनी युवकाला पारंपरिक झोळीच्या साहाय्याने खाली आणले. पायथ्याशी आधीच ॲम्ब्युलन्स व अन्य आवश्यक व्यवस्था सज्ज होती.

यानंतर संबंधित युवकाला तातडीने चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार उष्माघात किंवा हृदयविकाराच्या झटक्यामुळे रितेशचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज डॉक्टरांनी व्यक्त केला असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मृत युवक रितेश हा डोंबिवली पश्चिम, कोपर परिसरातील रहिवासी असून तो एसआय कॉलेजमध्ये शिक्षण घेत होता. त्याच्या मृत्यूप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

## पंतप्रधान मोदींनी केलेले आवाहन योग्यच –मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

पेट्रोल-डिझेल, गॅस यांसारख्या गोष्टींचा आपल्याला अमर्याद वापर करता येणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले आहे. पुरवठा साखळीची परिस्थिती पाहता आणि परकीय चलन आपल्याला कसे वाचवता येईल याकरिता त्यांनी केलेले आवाहन योग्यच आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

पंतप्रधान मोदींनी पेट्रोल-डिझेल, गॅसचा वापर, सोने खरेदी याबाबत केलेल्या आवाहनावर काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी टीका केली होती. यावर पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आताच्या घडीला ज्या प्रकारची जागतिक पातळीवर परिस्थिती तयार झाली आहे, त्याचा सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत आहे. आपल्या बाजूला असलेल्या पाकिस्तानात तर पेट्रोलचे भाव साडेचारशे रुपये इतके वर गेले आहेत. पेट्रोल-डिझेलची अनेक देशांत कमतरता आहे. आपल्या भारतामध्ये पंतप्रधान मोदींमुळे पेट्रोल-डिझेल व गॅस आपल्याला मिळत आहे.

पंतप्रधान मोदी यांनी जे सांगितले त्याचा जर अर्थ राहुल गांधींना कळला नाही, तर याचा दोष त्यांना देता येत नाही. कुठेतरी त्यांची समजच कमी आहे. देशात सर्वांत रिजेक्टेड नेता, रिजेक्टेड माल म्हणून अख्ख्या देशाने त्यांना नाकारले आहे. आम्ही त्यांना महत्त्व देत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुनावले.

## निदा खानला न्यायालयीन कोठडी

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमधील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धर्मांतर प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान हिला नाशिक रोड न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

निदाची पाच दिवसांची पोलीस कोठडी संपल्याने तिला सोमवारी (दि. ११) न्यायालयात हजर करण्यात आले होते. निदा गरोदर असल्याने तिला न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याचे समजते.



**उलवे नोड : गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्त्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित सत्कार आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उद्घाटन सोहळ्याच्या नियोजन व तयारीची आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी सोमवारी पाहणी केली. त्यांच्या समवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेलचे महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, विभागीय अध्यक्ष निलेश खारकर आदी उपस्थित होते.**

## जगातील कोणतीही शक्ती भारतावर दबाव आणू शकत नाही!

### पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

**सोमनाथ : वृत्तसंस्था**

गुजरातमधील ऐतिहासिक सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराला ७५ वर्षे झाल्याबाबत आयोजित विशेष कार्यक्रमास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती दर्शविली. या वेळी बोलताना त्यांनी, आजचा दिवस आणखी एका कारणासाठी खास आहे. ११ मे १९९८ रोजी देशाने पोखरणमध्ये तीन अणुचाचण्या केल्या. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने दाखवून दिले की जगातील कोणतीही शक्ती भारताला वाकवू किंवा दबाव आणू शकत नाही, असे प्रतिपादन केले.

काही महिन्यांपूर्वीच इथे होतो, तेव्हा सोमनाथ स्वाभिमान पर्व साजरे केले. या आधुनिक स्वरूपाच्या प्रतिष्ठापनेला ७५



वर्षे पूर्ण झाली आहेत. एक हजार वर्षांनीही सोमनाथ अविनाशी आहे, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, अणुचाचण्यांवेळी जगभरातील शक्ती भारताला नमवण्यासाठी पुढे आल्या होत्या. अनेक निर्बंध लादण्यात आले. आर्थिक संधीचे सर्व मार्ग बंद करण्यात आले, पण आपल्या शास्त्रज्ञांनी जगाला भारताची ताकद आणि क्षमता दाखवून दिली. यातून भारताची अढळ राजकीय इच्छाशक्ती जगाला दिसून आली.

देशाने पोखरण अणुचाचणीला 'ऑपरेशन शक्ती' असे नाव दिले. कारण शिवासोबत शक्तीची पूजा करणे ही आपली परंपरा आहे. आपली शिव आणि शक्तीची उपासना देशाच्या वैज्ञानिक प्रगतीलाही प्रेरणा देत राहो. आज आपण हा संकल्प साकार होताना पाहत आहोत. भगवान सोमनाथांच्या चरणी लीन होऊन सर्व देशवासीयांना 'ऑपरेशन शक्ती'च्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा देतो, असे पंतप्रधान मोदी यांनी म्हटले.




# आपत्ती व्यवस्थापनासाठी कोकण विभाग सज्ज

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आपत्ती काळात सर्व यंत्रणांनी नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणींना तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी अचूक नियोजन करावे, कार्य व बचाव साहित्य तात्काळ घटनास्थळी पोहचेल, याची खातरजमा करावी. तसेच आपत्ती व्यवस्थापनेबाबत नागरिकांना आवश्यक माहितीचा प्रचार व प्रसिध्दीवर विशेष भर द्यावा, असे निर्देश कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी दिले.



पावसाळा पूर्वीच्या आपत्ती व्यवस्थापन तयारीचा आढावा घेताना दूरदृष्यप्रणालीद्वारे कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांसह विविध यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

या बैठकीस ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर, सिंधुदूर्ग, मुंबईचे जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी,महानगरपालिका आयुक्त, नगरपालिका अधिकारी, जिल्हा परिषद अधिकारी, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम, कोकण रेल्वे, एसटी महामंडळ, नागरी संरक्षण, हवामान विभाग व औद्योगिक आरोग्य सुरक्षा विभागातील अधिकारी उपस्थित होते.

आयुक्त रुबल अग्रवाल म्हणाल्या की, कोकणात पावसाळ्यापूर्वी अचूक नियोजनाची आवश्यकता आहे. पावसाळयापूर्वी करण्यात येणारी नाले सफाई, रस्ते दुरुस्ती, झाडांची छाटणी अशी कामे पूर्ण करुन घेण्यात यावी.

कोकण विभागीय स्तरावर चोवीस तास नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून, सर्व जिल्हा आणि तालुका स्तरावरही अशाच प्रकारचे अहोरात्र नियंत्रण कक्ष सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून संबंधित प्राधिकरणाकडून मंजूरी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील नालेसफाईची कामे ३१ मे २०२६ पूर्वी १००% पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच अतिधोकादायक आणि बेकायदेशीर इमारतींमधील रहिवाशांच्या सुरक्षित स्थलांतराचे नियोजन तातडीने करण्याचे निर्देश महापालिका आयुक्तांना देण्यात आले आहेत.

कोकणात शोध व बचाव पथके कार्यरत असून त्यात प्रशिक्षित सदस्य आहेत. या सदस्यांनी "आपदा मित्र" उपक्रमांतर्गत तालुका व जिल्हास्तरीय प्रशिक्षण घेतले आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या साहित्यांची चाचणी घेण्यासाठी मॉक ड्रिल्स राबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

कोकण विभागात ०९ मोठे, ०९ मध्यम प्रकल्प आणि १४३ लघु प्रकल्प अशी धरणे आहेत.पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टीमुळे धरणे भरल्यास, नियोजित पद्धतीने पाण्याचा विसर्ग करावा व नागरिकांना वेळीच इशारा द्यावा. यासाठी स्थानिक प्रशासनाने (उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, नगरपालिका) जलद प्रतिक्रिया देण्यासाठी नियंत्रण कक्ष सुरू करावा. विसर्गाच्या आधी संबंधित यंत्रणांना सूचना देणे आवश्यक आहे, विशेषतः जेथे पाण्याचा धोका संभवतो. धबधब्यांच्या ठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजन करावे. अशा ठिकाणी जवळपासच्या रिसॉर्ट, हॉटेल मध्ये साहसी खेळांवर बंदी आणावी, अशा ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

त्या म्हणाल्या की, पावसाळ्यात साथीचे रोग वाढू शकतात. यासाठी औषधांचा साठा, पाण्याचे शुद्धीकरण, साथरोग नियंत्रण कक्ष स्थापनेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. नागरी संस्थांनी नियमितपणे पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासून घ्यावे.

## मोर्बा रोड कालवा मार्ग ते महामार्ग सर्व्हिस रस्त्याची दुरवस्था

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा मोर्बा रोड कालवा मार्ग ते महामार्ग जोडणारा सर्व्हिस रोड आज दुरवस्थेच्या खाईत सापडला आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे हा मार्ग वाहनचालकांसाठी धोकादायक बनला असून नागरिकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. निधीअभावी या रस्त्याचे काम गेल्या सहा महिन्यांपासून रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



माणगाव शहरातील वाढती वाहतूक आणि सततची कोंडी लक्षात घेऊन माणगाव बायपास आणि मोर्बा रोड कालवा मार्ग ते महामार्ग असा सर्व्हिस रोड मंजूर करण्यात आला होता. बायपास मार्गाचे काम सुरू झाले असले तरी कालवा मार्गावरील सर्व्हिस रोड अद्याप पूर्णत्वास जाऊ शकलेला नाही. परिणामी, शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत चालला आहे. सध्या म्हसळा, श्रीवर्धन आणि हरिहरेश्वरकडे जाणारी मोठ्या प्रमाणातील वाहतूक याच अरुंद आणि खराब मार्गावरून सुरू आहे. मात्र या मार्गावर सर्वत्र खड्डे पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच चारचाकी वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून काही ठिकाणी अपघातांच्याही घटना घडत आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या महत्त्वाच्या सर्व्हिस रोडसाठी सुमारे दहा कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. रस्ता विना अडथळा होण्यासाठी मार्गावरील अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली होती. तसेच या रस्त्याचे रुंदीकरणही करण्यात आले होते. एका बाजूचे डांबरीकरण पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीसाठी मार्ग खुला करण्यात आला

## म्हसळा नगराध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा

**अलिबाग : प्रतिनिधी**

म्हसळा नगराध्यक्ष शाहीद जंजिरकर यांनी अवघ्या चार दिवसात तडकाफडकी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांनी सोमवारी (दि. ११) जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा सादर केला.

म्हसळा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेनेचे शाहीद जंजिरकर काँग्रेसच्या मदतीने नगराध्यक्षपदी निवडून आले. जंजिरकर यांनी राष्ट्रवादीचे उमेदवार सुनील शेडगे यांचा पराभव केला होता.



वैयक्तिक कारणामुळे आपण राजीनामा देत असल्याचे शाहीद जंजीरकर यांनी आपल्या राजीनामा पत्रात नमूद केले आहे. पत्रकारांशी बोलताना मात्र त्यांनी आपण वरिष्ठांच्या आदेशानंतर पदाचा राजीनामा देत असल्याचे सांगितले. यावेळी नगरसेवक हरसल कादरी आणि नसीर मिठागरे त्यांच्या समवेत होते.

## गारमाळच्या रस्त्यावर हुल्लडबाज रायडर्सचा धुमाकूळ

**खोपोली : प्रतिनिधी**

घाटमाथ्यावर असलेल्या गारमाळचा रस्ता सद्य हुल्लडबाज आणि स्टंटबाजी करणाऱ्या रायडर्सचा अड्डा बनला या रस्त्यावर रायडर्सहे मोठ्या प्रमाणात येत असून येथे दुचाकीवर स्टंटबाजी करत आहे त्यामुळे या रस्त्यावर भीषण अपघात होण्याची शक्यता आहे



मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर नव्याने तयार करण्यात आलेल्या मिसिंग लिंक हा गारमाळ येथून पूर्णपणे दिसत हा ब्रिज पाहण्यासाठी सद्य पर्यटकांसह रायडर्स हे मोठ्या प्रमाणात येत आहे तर येथून ड्रोन द्वारे मिसिंग लिंकची शुटिंग करून नंतर ते येथे स्टंटबाजी करत आपली दुचाकी एका टायरवर उभी करून वेगवेगळे स्टंट करत आहेत तर या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठी दरी असल्याने जर एखाद्या रायडर्सचे दुचाकी वरील नियंत्रण सुटल्याने तो थेट दरीत कोसळून मोठा अपघात होण्याची दाट शक्यता आहे,

दस्तुरी ते गारमाळ हा चार किमीचा रस्ता अवघड वळणाचा असून येथून येतानाही हे रायडर्स रेसिंग लावत येत आहे त्यामुळे यांचा ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे अश्या हुल्लडबाज आणि स्टंटबाजी करण्याऱ्या रायडर्सवर पोलिसांनी कठोर कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे

## ओलेंडर फार्म येथे काम करणाऱ्या महिलेचा विनयभंग

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील खैराट येथील ओलेंडर फार्म परिसरात डेकोरेशनचे काम करणाऱ्या एका महिलेचा विनयभंग झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक १० मे रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास ओलेंडर फार्म, खैराट ता. खालापूर येथे महिला फिर्यादी या डेकोरेशनचे काम करीत होत्या. त्यावेळी ओलेंडर फार्ममधील आरोपी,ऋषिकेश रवींद्र सकपाल मोहाचीवाडी, नेरळ याने संबंधित महिलेस "आप बहुत खुबसुरत हो" असे बोलून अश्लील कृत्य करत तिचा विनयभंग केल्याची तक्रार करण्यात आली आहे.

या प्रकारामुळे फिर्यादी महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न झाली असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या घटनेनंतर महिला फिर्यादीने खालापूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीविरोधात संबंधित गुन्हा नोंदवला

## पडसरे अनुदानित आश्रमशाळेच्या आदिवासी विद्यार्थ्यांनी गाठले यशाचे शिखर

**पाली : प्रतिनिधी**

कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ पाली संचलित, अनुदानित आश्रमशाळा पडसरे येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. घरची बेताची परिस्थिती, कौटुंबिक संकटे आणि दुर्गम भागातील आव्हाने यावर विद्यार्थ्यांनी मात केली आहे. या आश्रमशाळेचा निकाल ९७.७७ टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर यशाचा टप्पा पार केला आहे.

फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये झालेल्या या परीक्षेसाठी शाळेतून एकूण ४५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ४४ विद्यार्थी यशस्वीपणे उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये प्रथम क्रमांक कुमारी रामेश्वरी रवींद्र पवार ७७%, द्वितीय क्रमांक कुमारी रेणुका विष्णू हिरवा ७५%, तर तृतीय कुमारी स्वाती हरी निरगुड ७१% मिळवला आहे.

या निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे गुणवंत विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे यश खेचून आणले आहे. शिवाय अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत केवळ कष्ट आणि जिद्दीच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी केली आहे, असे मुख्याध्यापक संदीप शिंदे यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांच्या या यशात शाळेतील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच ज्ञान प्रबोधिनी, पुणे आणि एसपी फाऊंडेशन, मुंबई यांचे शैक्षणिक सहकार्य व मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

या यशाबद्दल संस्थेचे संचालक रवींद्र लिमये आणि मुख्याध्यापक संदीप शिंदे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## महालक्ष्मी सरस प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुंबई : प्रतिनिधी**

महालक्ष्मी सरस २०२ प्रदर्शनाला नागरिकांची मोठी मागणी असून , २ मे पासून सुरू झालेल्या या प्रदर्शनात विक्रमी उत्पादनाची माहिती महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश आणि संचालन अधिकारी निखिलकुमार ओसवाल यांनी दिली.

यंदाच्या महालक्ष्मी सरसमध्ये ५३५ उत्पादक स्टॉल्स आणि ८० खाद्यपदार्थ स्टॉल्स सहभागी आहेत. उत्पादनांची गुणवत्ता , पॅकेजिंग आणि नावीन्य लक्षात घेणाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. नवोदित महिलांनाही मोठी ताकद देण्यात आली आहे. नागरिकांसाठी बस सेवा , घरपोच सेवा तसेच दिव्यांगांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. मुंबई महालक्ष्मी सरस २०२६ च्या आठवड्यात १५ कोटी व्यवसाय झाला आहे.

## बेकायदेशीर शेडचे पत्रे उडाल्याने रस्ता झाला बंद

**चौक : प्रतिनिधी**

अचानक काल सायंकाळी आलेल्या धुळीचे लोट, तुफान पाऊस आणि जोरदार वाऱ्याने जुना मुंबई पुणे रस्त्यावर एका बंगल्याला बांधण्यात आलेली शेड मुळासकट उडून जाऊन त्याचे काही पत्रे मुंबई पुणे रस्त्यावर पडल्याने वाहतूक कोंडी झाली, आणि ही वाहतूक कोंडी साधारण चार किमी.कोंडी झाली होती.



काल सायंकाळी अचानक आलेल्या धुळीचे लोट तुफान पाऊस आणि जोरदार वाऱ्याने मोठे नुकसान केले असून याचा फटका मुंबई पुणे रस्त्यावर वाहतूक कोंडीत झाला. येथे बन्सल नावाचा मोठा बंगला आहे, या बंगल्याला पूर्ण झाकून ठेवण्यासाठी प्रचंड मोठी पत्र्याची शेड उभी केली आहे. या शेडचे पत्रे उडून माळरानावर विखुरले आहेत. हे धारदार पत्रे उडताना त्यांनी नारळाची, सुपारीचे असलेली झाडे कापून काढली, तर वीज पुरवठा करणाऱ्या विद्युत् खांब व वाहिन्यांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे, विद्युत खांब वर देखील पत्रा अडकून बसला आहे.त्यामुळे विद्युत खांब वाकले आणि विद्युत वाहिन्या खाली आल्या,त्यातच पत्रे रस्त्यावर पडल्याने दोन्ही बाजूंनी वाहतूक कोंडी प्रचंड प्रमाणात झाली,

याची दखल घेऊन सामाजिक कार्यकर्ते व अपघातग्रस्त यांना मदत करणारे रामदास काईनकर यांनी तातडीने आय आर बी या रस्ता देखभाल दुरुस्ती करणाऱ्या कंपन्यांना व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना कळविले, झाडे कापणारे यांना पाचारण करून रस्त्यावर पडलेल्या झाडांना बाजूला करण्याचे प्रयत्न केले.यावेळी वाहतूक पोलीस, खालापूर व चौक पोलीस,वावंढळ गावची तरुण मुले, नागरिक यांनी झाडे बाजूला करण्यास मदत केली.

## चौकर पाखाडी येथे डंपरची विद्युत खांबाला धडक; जीवंत वीज वाहकतारा पडल्या रस्त्यावर

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील जीवनाबंदर व दांडे या ठिकाणी नवीन जेट्टीची निर्मिती केली जात आहे. यासाठी फोरकॉन कंपनीने या कामाचा ठेका घेतलेला असून ३० ते ३५ टन दगड भरलेले अवजड डंपर श्रीवर्धन शहरातील विठ्ठल आळी, नारायण पाखाडी, चौकर पाखाडी या ठिकाणाहून दांडे परिसराकडे नेण्यात येतात. सदर अवजड वाहतुकीमुळे या मार्गावरील सर्व रस्त्यांची दुर्दशा झाली आहे. तर रस्त्याची पिचींगदेखील पूर्णपणे तुटून गेली आहेत.

आज चौकर पाखाडी येथे फोरकॉन कंपनीच्या डंपरने बाक्कर यांच्या घरासमोरील विद्युत खांबाला जोरदार धडक दिली. यावेळी धडक झाल्यानंतर वीज वाहक तारा ज्या मधून वीज पुरवठा सुरू होता, त्या रस्त्यावरती कोसळल्या. परंतु परिसरात कोणीही नागरिक फिरत नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. परंतु सदरचा पोल पडल्यामुळे चौकर पाखाडी या परिसरामध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. नवीन विद्युत पोल उभा करण्यासाठी महावितरणची टीम तातडीने दाखल झाल्यामुळे रात्रीपर्यंत वीज पुरवठा सुरू होईल असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

आज दिवसभर या घटनांमुळे वीज पुरवठा खंडित झाला होता. तर उद्या मंगळवार असून देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी दिवसभर वीज पुरवठा खंडित राहणार आहे. श्रीवर्धन शहरातील रस्त्यांवरून वाहतूक करताना फोरकॉन कंपनीच्या मॅनेजरने त्यांच्या चालकांना वाहने सावकाश चालण्याच्या सूचना द्याव्यात. अन्यथा नागरिकांकडून सदर कंपनीच्या विरोधात आंदोलन करण्यात येण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# पाली, पोलादपूर पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पाली आणि पोलादपूर नगरपंचायतींसाठी घेण्यात येणाऱ्या पोटनिवडणुकीच्या संबंधातील कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जाहीर केला आहे. प्रभागाचे नाव व क्रमांक-१३, १४, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे नाव- उत्तम कुंभार, तहसीलदार, सुधागड, तहसील कार्यालय सुधागड, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-याचे नाव- कोमल कराळे, मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत, नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी- दि. १८ मे २०२६ (सोमवार) ते दि. २५ मे २०२६ (सोमवार), (सकाळी ११ ते दुपारी ३ कालावधीत). दि. २३ मे २०२६ शनिवार व दि. २४ मे २०२६ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याचे ठिकाण- नगरपंचायत कार्यालय पाली, ता. सुधागड,जि.रायगड, नामनिर्देशन पत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक- दि. २६ मे २०२६ (मंगळवार) सकाळी ११ वाजेपासून, नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा कालावधी अपील नसेल तेथे दि. २७ मे २०२६ (बुधवार) ते दि. २ मे २०२६ (मंगळवार) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत, (दि. २८ मे २०२६ गुरुवार, दि. ३० मे २०२६ शनिवार व दि. ३१ मे २०२६ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे मागे घेता येणार नाहीत. अपिल असल्यास- वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आज जिल्हा न्यायाधीशांकडे अपील करता येईल. अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ कालावधीत मात्र दि. ११ जून २०२६ (गुरुवार) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत. नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याची व ते मागे घेण्याचे ठिकाण- नगरपंचायत कार्यालय पाली, ता. सुधागड,जि. रायगड, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक- अपील नसेल तेथे : दि.०२/०६/२०२६ (मंगळवार) रोजी दुपारी ०३.०० वाजे नंतर अपील असल्यास : दि.११/०६/२०२६ (गुरुवार) रोजी दुपारी ०३.०० वाजे नंतर, आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक- दि.२०/०६/२०२६ (शनिवार) सकाळी ७.३०पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत, मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक- दिनांक २१/०६/२०२६ (रविवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून, मत मोजणीचे ठिकाण- हिरकणी कक्ष, तहसील कार्यालय सुधागड- पाली, ता.सुधागड, जि.रायगड, महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे- दि.२३/०६/२०२६ (मंगळवार) कलम १९ मधील तरतुदीनुसार असेल.




**पोलादपूर नगरपंचायतीसाठी**

प्रभागाचे नाव व क्रमांक-१ निवडणुक निर्णय अधिकाऱ्याचे नाव- महेश शितोळे, तहसिलदार, महाड, तहसिल कार्यालय महाड, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिका-याचे नाव- विनय शिपाई, मुख्याधिकारी, पोलादपूर नगरपंचायत, नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी- दि. १८/०५/२०२६ (सोमवार) ते दि.२५/०५/२०२६ (सोमवार), (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० कालावधीत) (दि.२३/०५/२०२६ शनिवार व दि.२४/०५/२०२६ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याचे ठिकाण- तहसिल कार्यालय पोलादपूर, ता. पोलादपूर, जि. रायगड, नामनिर्देशन पत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक- दि.२६/०५/२०२६ (मंगळवार) सकाळी ११:०० वाजेपासून,नामनिर्देशन पत्र मागे घेण्याचा कालावधी अपील नसेल तेथे- दि.२७/०५/२०२६ (बुधवार) तेदि.०२/०६/२०२६ (मंगळवार) सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० वाजेपर्यंत (दि.२८/०५/२०२६ गुरुवार, दि.३०/०५/२०२६ शनिवार वदि.३१/०५/२०२६ रविवार या सुट्टीच्या दिवशी नामनिर्देशन पत्रे मागे घेता येणार नाहीत, अपिल असल्यास वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आज जिल्हा न्यायाधीशांकडे अपील करता येईलअपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यांत येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वीकार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० कालावधीत मात्रदि.११/०६/२०२६ (गुरुवार) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याची व ते मागे घेण्याचे ठिकाण- तहसिल कार्यालय पोलादपूर, ता. पोलादपूर, जि. रायगड, निवडणूक चिन्हे नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक- अपील नसेल तेथे :दि.०२/०६/२०२६ (मंगळवार) रोजी दुपारी ०३.०० वाजेनंतर अपील असल्यास :दि.११/०६/२०२६ (गुरुवार) रोजी दुपारी ०३.०० वाजे नंतर आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक दि.२०/०६/२०२६ (शनिवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक २१/०६/२०२६ (रविवार) सकाळी १०.०० वाजल्या पासून , मत मोजणीचे ठिकाण- तहसिल कार्यालय पोलादपूर, ता. पोलादपूर, जि. रायगड, महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे- दि.२३/०६/२०२६ (मंगळवार) कलम १९ मधील तरतुदीनुसार

## संपादकीय

# सेनापतीची परीक्षा सुरू!

सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेनेने विरोधकांपेक्षाही अधिक कडवटपणे सरकारला अडचणीत आणण्याची संधी अनेकदा साधली होती, हे महाराष्ट्रात फडणवीस सरकारच्या याआधीच्या कार्यकाळात दिसून आले आहे. त्यामुळे, समन्वय साधण्याची मोठी कसरत देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली होती, आणि तेच आव्हान आता तमिळनाडूत विजय यांच्या सरकारसमोर राहणार आहे.

**तमिळनाडू विधानभेची निवडणूक लढविल्यानंतर पहिल्याच विजयात थेट मुख्यमंत्रीपद मिळविणाऱ्या विजय यांच्या पदग्रहणानंतर, एखाद्या चित्रपटात शोभतील अशा रीतीने मुख्यमंत्री कार्यालयातून कागदपत्रांच्या आणि झटपट निर्णयांच्या वेगवान हालचाली सुरू झाल्या आहेत. सुमारे पन्नास वर्षे राजनीतीमध्ये 'मुरलेल्या' अनुभवी नेत्यापासून डिजिटल माध्यमातून जनतेसमोर आलेल्या तरुण कार्यकर्त्यापर्यंत आणि सनदी अधिकाऱ्यापासून खेळाडूपर्यंत वेगवेगळ्या चेहऱ्यांना स्थान देऊन विजय यांनी मंत्रिमंडळाचा चेहरा बहुरंगी केला असला, तरी प्रत्यक्ष राज्यकारभारात त्यांच्या सरकारला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार असल्याने, या चेहऱ्यांचा आणि विजय यांच्या अभिनेता म्हणून असलेल्या प्रतिमेचा त्यास कसा हातभार लागतो, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. कारण, त्यांच्यासमोरील आव्हानांचा राज्याच्या धोरणांवरही परिणाम होणार आहे. विजय सरकारकडे बहुमतासाठी आवश्यक संख्येपेक्षा अवघे दोन आमदार जास्त आहेत. या सरकारमध्ये पाच सहयोगी पक्ष आहेत. त्यांपैकी काही पक्ष विजय यांच्यासोबत असले, तरी त्यांची विचारसरणी वेगळी आहे. भाकप आणि माकप या पक्षांनी केवळ भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याच्या उद्देशाने विजय सरकारला पाठिंबा दिला असून निवडणुकीपूर्वी द्रमुकच्या गळ्यात गळा घातलेल्या काँग्रेसनेही द्रमुकसोबत काडीमोड घेत केवळ भाजपद्वेषापोटी विजय सरकारसोबत हातमिळवणी केली आहे. विजय यांच्या पक्षाने सरकार स्थापन करण्याएवढे संख्याबळ जमवले नसते, तर तमिळनाडूवर राष्ट्रपती राजवटीची टांगती तलवार राहिली असती. ते टाळण्याच्या एकमेव उद्देशातून व्हीसीके या आणखी एका पक्षानेही विजय सरकारला बाहेरून पाठिंबा दिला असला, तरी विजय यांचे सरकार स्थिर ठेवण्यापेक्षा अखिल भारतीय अण्णाद्रमुक पक्षाला सत्तेपासून दूर ठेवणे एवढेच या पक्षांचे उद्दिष्ट दिसते. त्यामुळे, विजय यांच्या धोरणात्मक कार्यपद्धतीत या पक्षांची त्यांना किती साथ मिळेल, हे प्रश्न काळाच्या ओघात समोर येत राहणार आहेत. व्हीसीके हा पक्ष विजय सरकारला बाहेरून पाठिंबा देत असला तरी तो द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीतदेखील सहभागी असल्याने, या पक्षाकडून एकाच वेळी सरकारविरोधी आघाडीतील पक्ष आणि सरकारला पाठिंबा देणारा पक्ष अशी दुहेरी भूमिका बजावताना झुकते माप कोठे असेल या प्रश्नाचा दबावही विजय सरकारवर राहणार आहे. सत्तेच्या खेळात आघाडीचे राजकारण नेहमीच गुंतागुंतीचे असते. अनेकदा नको असतानाही तडजोडी कराव्या लागतात. म्हणजे, सरकारसोबत असलेल्या पक्षांचे हितसंबंध आणि प्राधान्यक्रम हे सरकारच्या उद्दिष्टांशी नेहमी जुळतीलच असे नाही. तमीळनाडूच्या शिरावर दहा लाख कोटींचे कर्ज असल्याची जाणीव विजय यांनीच बोलून दाखविली आहे. त्यामुळे, राज्याची आर्थिक स्थिती सांभाळत निवडणुकीतील आश्वासने पूर्ण करण्याची कसरत करणे कसे साधते, यावरही सरकारचे स्थैर्य अवलंबून असेल. सत्ता हाती घेतल्यानंतर लगेचच विजय यांनी २०० युनिट मोफत वीज आणि विशेष कार्यबल स्थापन करण्याचे आदेश दिले. राज्याच्या आर्थिक स्थितीबाबत 'श्वेतपत्रिका' आणण्याची घोषणाही त्यांनी केली आहे. पारदर्शकतेच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते. त्यातून समोर येणारे चित्र विजय सरकारच्या वाटचालीचे वास्तव आणि भवितव्य स्पष्ट करणारे ठरेल.**

# टेकवारी २.० : प्रशासनाला नाविन्यपूर्णतेचा ध्यास!



महाराष्ट्राचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या मंत्रालयाने ४ ते ८ मे २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत एका सरकारी कार्यालयापलीकडे जाऊन एक वेगळेच स्थित्यंतर अनुभवले. या कालावधीत आयोजित टेकवारी २.० उपक्रम हा प्रशिक्षण, सहयोग आणि ऋणानुबंधाचा एक अनोखा प्रयोग ठरला. जिथे तंत्रज्ञान शासनाला भेटले, आरोग्य प्रशासनाशी जोडले गेले आणि संस्कृतीने नवकल्पनेशी सुंदर सोबत केली! शासनात आपण अनेकदा व्यवस्था, धोरण आणि प्रक्रियांबद्दल बोलतो. परंतु, टेकवारी २.० ने लोक, त्यांची मने, त्यांची मूल्ये, त्यांचे आरोग्य, त्यांची सर्जनशीलता आणि बदलत्या जगाशी जुळवून घेण्याची त्यांची इच्छाशक्ती याबद्दलच प्रशासन अंतिमतः कार्यरत असते, याची जाणीव करून दिली.

महाराष्ट्राच्या 'वारी' परंपरेतून प्रेरणा घेऊन, जिथे हजारो मंडळी भक्ती, शिस्त आणि ध्येयाने पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात, टेकवारीने तीच भावना प्रशासनात आणली आणि त्यातून हा 'लर्निंग वीक' (शिक्षण सप्ताह) नवविचारांची आधुनिक 'यात्रा' ठरला.

टेकवारी २.०चे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील समतोल. हा केवळ आर्टिफिशिअल इंटेलिजन्स किंवा डिजिटल प्रशासनावरील उपक्रम नव्हता. त्याची रचना एक सर्वांगीण शिक्षण चळवळ म्हणून करण्यात आली होती. यामध्ये सायबर सुरक्षा, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि इंडिया स्टॅकपासून ते योगासने, तणाव व्यवस्थापन, पालकत्व आणि प्रशासनातील नैतिकता अशा विविध विषयांवरील सत्रांचा समावेश होता.

टेकवारी २.० मध्ये एका हॉलमध्ये अधिकारी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि AI-आधारित प्रशासनाच्या भविष्यावर चर्चा करत होते, तर दुसऱ्या हॉलमध्ये सहभागी मानसिक स्वास्थ्य, निकोप जीवन आणि भावनिक संतुलनाबद्दल शिकत होते. टेकवारी २.० मध्ये नाविन्यपूर्ण संकल्पना, आरोग्यदायी अन्न आणि पोषण दर्शविणारी प्रदर्शने देखील होती. या साऱ्यांमुळे मंत्रालयाचे 'त्रिमूर्ती प्रांगण' विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी, लय आणि ऊर्जेने भरून गेले होते.

भविष्यासाठी सज्ज असलेले प्रशासन केवळ तंत्रज्ञानावर उभारता येत नाही. त्यात सहानुभूती, आरोग्य, नैतिकता आणि सर्जनशीलता देखील अंतर्भूत असावी लागते. टेकवारीचे खरोखर लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे त्याची व्याप्ती आणि सर्वसमावेशकता. मंत्रालयात ६,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग घेतला, तर जिल्ह्या-जिल्ह्यांमधून लाखो कर्मचारी 'लाइव्ह स्ट्रीमिंग'द्वारे जोडले गेले. शिक्षणाच्या प्रवासात कोणताही कर्मचारी मागे राहू नये, ही साधी पण प्रभावी कल्पना त्यामागे होती.

निलेश परब आणि त्यांच्या टीमने सादर केलेले 'तालरंग' हे लयबद्ध उद्घाटन सादरीकरण खूप सुंदर वेगळेपणाने सादर झाले . प्रारंभी एक संगीत सादरीकरण वाटणारे नंतर प्रशासनाचे रूपक बनले. प्रत्येक वाद्याची एक भूमिका होती. प्रत्येक ताल समन्वयावर अवलंबून होता. प्रत्येक आवाजाप्रमाणेच प्रत्येक विरामालाही महत्त्व होते.

अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवरांनी हे समन्वयित सादरीकरण पाहिले तेव्हा त्यातील संदेश उलगडला. प्रशासन हे देखील एका ऑर्केस्ट्रासारखे (वाद्यवृंद) आहे. विविध विभाग, अधिकारी, संस्था आणि नागरिक यांच्यात सुसंवाद आणि समन्वय असल्याशिवाय सुशासन अशक्य आहे.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्यासह वरिष्ठ नेतृत्वाच्या सहभागाने शिक्षण आणि स्वीकार ही प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावरील सामायिक जबाबदारी असल्याची कल्पना अधिक दृढ केली.

या सप्ताहाने तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, प्रशासक, आरोग्य तज्ज्ञ, कलाकार आणि प्रशिक्षकांना एकत्र आणले. एआय, सायबर सुरक्षा, DPDP कायदा २०२३, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि डिजिटल प्रशासनावरील सत्रांनी प्रशासकीय परीघ किती वेगाने विस्तारित आहे हे प्रतिबिंबित केले. तर नैतिकता, नेतृत्व, टीकेस तोंड देणे आणि तणाव व्यवस्थापन यावरील चर्चांनी त्याला अर्थ प्राप्त करून दिला.

आज प्रशासकांकडून केवळ फाईल्स आणि धोरणे याबाबतच काम करण्याची अपेक्षा नाही, तर जनतेच्या अपेक्षा, डिजिटल परिवर्तन आणि भावनिक दडपण सांभाळण्याचीही अपेक्षा आहे. टेकवारीने ही वस्तुस्थिती प्रामाणिकपणे आणि संवेदनशीलतेने स्वीकारली.

टेकवारीचा सर्वात सुंदर पैलू म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आत्म्याशी जोडलेले त्याचे घट्ट नाते. 'नादरंग' आणि 'योगरंग' पासून 'कलारंग' आणि वारी संस्कृतीच्या अंतिम चित्रणापर्यंत, प्रत्येक संध्याकाळ ही आठवण करून देत होती की प्रगती म्हणजे परंपरांचा त्याग करणे नव्हे.

कला, एआय आणि प्रशासन यांवरील संवादांनी हा समतोल सुंदरपणे साधला. कलाकार, चित्रपट निर्माते आणि सर्जनशील मनांनी तंत्रज्ञान हे कल्पनाशक्ती आणि सांस्कृतिक ओळखीसह कसे बहरु शकते, याचा मनोज्ञ शोध घेतला.

ज्या काळात तंत्रज्ञानावरील चर्चा अनेकदा कोरड्या आणि यांत्रिक वाटतात, तिथे टेकवारीने नाविन्याला एक जिवंत मानवी चेहरा दिला. टेकवारी २.० हे केवळ सत्रांचे वेळापत्रक नव्हते. ते असे वातावरण होते जिथे अधिकारी शिकण्यासाठी थांबले; जिथे तंत्रज्ञानावर निर्भयतेने चर्चा झाली; जिथे आरोग्याला पर्यायी नव्हे तर अत्यावश्यक मानले गेले आणि जिथे प्रशासनाच्या केंद्रस्थानी संस्कृतीचा उत्सव साजरा झाला. या साऱ्यातून काही दिवसांसाठी मंत्रालय ही केवळ प्रशासकीय इमारत न राहता 'कुतूहलाचा परिसर' बनली.

हा उपक्रम 'महा-साधना सप्ताहा'च्या माध्यमातून सुरू असलेल्या एका मोठ्या परिवर्तनाच्या प्रवासाचे प्रतिबिंब होता, जिथे नऊ लाख कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' प्लॅटफॉर्मवर संरचित शिक्षण पूर्ण केले आणि केवळ एका आठवड्यात ३५ लाख लर्निंग अवर्सची (शिकण्याच्या तासांची) विक्रमी नोंद केली. ही केवळ आकडेवारी नसून, शासन आणि त्याचे नेतृत्व आपल्या लोकांमध्ये जाणीवपूर्वक गुंतवणूक करत असल्याचे दर्शवते.

टेकवारी २.० चे कदाचित सर्वात मोठे यश हे आहे की, त्याने आपल्याला आठवण करून दिली की शिक्षण कधीही संपत नाही, विशेषतः सार्वजनिक सेवेत. भविष्यातील प्रशासन केवळ अधिकार असलेल्यांचे नसेल, तर जे शिकण्यासाठी, जुळवून घेण्यासाठी, सहयोग करण्यासाठी आणि मानवी मूल्यांशी जोडलेले राहण्यासाठी तयार आहेत, त्यांचे असेल.

"तुझे नाव ओठी, तुझे रूप ध्यानी
जिवाला तुझी आस गा लागली
जरी बाप साऱ्या जगाचा परि तू
आम्हा लेकरांची विठू माऊली
माऊली माऊली, माऊली माऊली
माऊली माऊली, रूप तुझे"

हृदयात असलेली हीच भावना नेतृत्वाला सत्तेच्या माध्यमातून सहानुभूतीच्या भावनेत रूपांतरित करते. 'बाप' हा व्यवस्थेतील अधिकार, नियम आणि प्रशासनासाठी आवश्यक असलेल्या वस्तुनिष्ठ न्यायाचे प्रतिनिधित्व करतो, तर 'माऊली' ही सहानुभूती आणि सुलभतेचे प्रतिनिधित्व करते जी प्रशासनाला 'आत्मा' देते. सेवेत खरी उत्कृष्टता तेव्हाच येते जेव्हा एखादा प्रशासक आपल्या पदाच्या पलीकडे जाऊन एक 'कल्याणकारी पालक' होतो; हे सिद्ध करतो की सर्वात प्रभावी शासन हे दूरस्थ आदेशांद्वारे नाही, तर प्रत्येक नागरिकाच्या कल्याणासाठी असलेल्या पालनपोषण करणाऱ्या बांधिलकीतून जाणवत असते.

सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा (आयएएस) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेला 'टेकवारी २.०'चा उपक्रम महाराष्ट्र भविष्यासाठी सज्ज आहे आणि प्रशासन हे संस्कृती व करुणेशी असलेली नाळ कायम ठेवून शिकू शकते, विकसित होऊ शकते आणि नाविन्य आणू शकते, हा दिशादर्शक विचार रुजविण्यात खरोखरच यशस्वी ठरला.

**-आर. विमला (भा.प्र.से.), निवासी आयुक्त आणि सचिव, महाराष्ट्र शासन**

## बदलते तंत्रज्ञान

# आयटेल A१००C स्मार्टफोन लाँच

टेक कंपनी आयटेलने आपला नवीन स्टायलिश स्मार्टफोन A१००C न्यू लॉन्च केला आहे. कंपनीने हा फोन खास अशा लोकांसाठी सादर केला आहे, ज्यांना कमी बजेटमध्ये मजबूत आणि उत्तम फीचर्स असलेला फोन हवा आहे.




या स्मार्टफोनची सर्वात मोठी खासियत म्हणजे त्याची मजबुती. याला मिलिटरी ग्रेड सर्टिफिकेशन (MIL-STD-८१०H) मिळाले आहे, जे त्याला पडण्यापासून किंवा धयांपासून खराब होण्यापासून वाचवते. CMR ड्युरेबिलिटी इंडेक्स रिपोर्ट २०२६नुसार आयटेल १० हजार रुपयांपेक्षा कमी किमतीच्या सेगमेंटमध्ये देशातील सर्वात विश्वासार्ह आणि टिकाऊ ब्रँड म्हणून उदयास आला आहे.

मेमरी आणि परफॉर्मन्स : ६४GB स्टोरेजसह ऑक्टा-कोर प्रोसेसरस्मार्टफोन २GB रॅमसह येतो, ज्याला व्हर्च्युअल रॅमच्या मदतीने ४GB ने वाढवून एकूण ६GBपर्यंत करता येते. यात ६४GB ची इंटरनल स्टोरेज दिली आहे. फोनचा वेग सुधारण्यासाठी यात युनिसोक T७१०० ऑक्टा-कोर प्रोसेसर दिला आहे. हा अँड्रॉइड १५ गो एडिशनवर चालतो, जो कमी रॅम असलेल्या फोनमध्येही स्मूथ गेमिंग आणि व्हिडिओ कॉलिंगचा अनुभव देतो.

उत्तम व्हिज्युअल अनुभवासाठी, फोनमध्ये ६.६-इंचाचा HD+ डिस्प्ले देण्यात आला आहे, जो ९०Hz रिफ्रेश रेटला सपोर्ट करतो. स्क्रीन वापरण्यास अतिशय स्मूथ आहे. ऑडिओसाठी यात DTS पावर्ड साऊंड टेक्नॉलॉजी देण्यात आली आहे, जी चित्रपट पाहताना किंवा गाणी ऐकताना उत्कृष्ट आवाज देते.दीर्घकाळ वापरासाठी आयटेलने यात ५०००mAhची मोठी बॅटरी दिली आहे, जी चार्ज करण्यासाठी १०Wचा चार्जर सोबत मिळतो. सुरक्षेसाठी फोनमध्ये फेस अनलॉकसह साइड-माउंटेड फिंगरप्रिंट सेन्सर देण्यात आला आहे, जो तो वापरण्यास सोपा आणि सुरक्षित बनवतो. फोनमध्ये एक खास 'डायनॅमिक बार' फीचर देण्यात आले आहे. याच्या मदतीने युझर कोणत्याही अडथळ्याशिवाय बॅटरी स्टेटस, कॉल आणि नोटिफिकेशन्स तपासू शकतात.

फोटोग्राफीसाठी यात अॅडव्हान्स्ड इमेज प्रोसेसिंग असलेला ८MPचा रियर कॅमेरा आहे, जो उत्कृष्ट आणि जिवंत फोटो क्लिक करण्यास सक्षम आहे.

# भारतीय तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती



## निमित्त

जे. कृष्णमूर्ती हे प्रख्यात भारतीय विचारवंत. आध्यात्मिक उन्नती ही गुरू, संस्था किंवा धर्म यांच्यामार्फत होत नसून आपल्या मनाचे सर्व व्यवहार तटस्थतेने पाहून आत्मनिरीक्षण व आत्मपरीक्षण या आधारांवर होऊ शकते, अशा तत्त्वज्ञानाची त्यांनी मांडणी केली. त्यांचा जन्म ११ मे १८९५ तामिळनाडू राज्यातील मदनपल्ली (जि. चित्तूर) या गावात नारायणअय्या आणि संजिवाम्मा या दाम्पत्यापोटी झाला. त्यांचे आडनाव जिद्दू होते. या दाम्पत्याला एकूण दहा मुले होती. त्यांपैकी कृष्णमूर्ती हे आठवे अपत्य. म्हणून त्यांचे नाव आवडीने कृष्ण असे ठेवले. डॉ. ॲनी बेझंट यांनी कृष्णमूर्ती व त्यांचा लहान भाऊ नित्यानंद (नित्या) यांचा प्रथमपासून सांभाळ केला.


डॉ. ॲनी बेझंट व सी. डब्ल्यू. लेडबीटर यांना कृष्णमूर्तींमध्ये भावी काळातील मैत्रेय जगद्गुरूंच्या मीलनाची शक्यता जाणवली. डॉ. ॲनी बेझंट यांनी खासगीरीत्या नामांकित शिक्षकांकरवी इंग्लंडमध्ये कृष्णमूर्तींचे शिक्षण पूर्ण करून घेतले. त्या अनुषंगाने कृष्णमूर्तींच्या आध्यात्मिक कार्याकरिता व येऊ घातलेल्या जगद्गुरूंच्या आगमनाच्या तयारीसाठी १९११ मध्ये 'पूर्वतारक संघ' या संस्थेची आणि तिच्या हेराल्ड ऑफ द स्टार या मुखपत्राची स्थापना करण्यात आली. संघाच्या प्रमुखपदी कृष्णमूर्तींच्या नावाची घोषणा केली गेली. या संघाचे वार्षिक मेळावे भरत. तसेच जगद्गुरूंशी मीलन झाल्याची घोषणा होऊन कृष्णमूर्तींची स्वतंत्र विचारांची प्रवचने होत. त्यामुळे त्यांची कीर्ती जगभर झाली.

नंतरच्या काळात १९२८ मध्ये कृष्णमूर्ती थिऑसफिकल वातावरणापासून दूर झाले. प्रत्येकाने स्वतःची मुक्ती स्वतः नव्याने शोधायची असते, कोणतीही संघटित धर्मसंस्था किंवा गुरू आपल्याला सत्याप्रत नेऊ शकत नाही; किंबहुना सत्याकडे जाणारा कोणताही मार्ग नाही, असे प्रतिपादन करत १९२९ च्या जाहीर प्रवचनात कृष्णमूर्तींनी या जागतिक स्वरूपाच्या संस्थेचे विसर्जन केले आणि लोकांशी संपर्क व संवाद साधून मानवाच्या मूलभूत जाणिवांमध्ये बदल होणे कसे गरजेचे आहे, हे सांगण्याचा प्रयत्न केला.

जे. कृष्णमूर्ती यांनी कोणतेही धार्मिक ग्रंथ वाचले नव्हते भगवद्गीता, वेद उपनिषदे, बायबल, कुराण या धार्मिक ग्रंथात कोणता उपदेश सांगितला आहे हे त्यांना माहित नव्हते आणि त्यात त्यांना रसही नव्हता. परंतु भारतीय वेदांतशास्त्रातील अद्वैत दर्शनात प्रकट झालेले चिंतन आणि कृष्णामूर्तींचे चिंतन यात विलक्षण साम्य आढळते असा तत्वाज्ञानाच्या अभ्यासकांचा अभिप्राय आहे. कुठल्याही महावाक्याचा किंवा एखाद्या धार्मिक सूत्राचा आधार न घेता जीवनाकडे सरळपणे पाहण्याची दृष्टी त्यांच्या चिंतनात दिसते. जे आहे, दैनंदिन जीवनातील मानवीसमस्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच समाजातही कसा कलह निर्माण करतात व त्यामधूनच कशाप्रकारे हिंसा, स्पर्धा निर्माण होते आणि अंतर्गत सुरक्षा व आनंदाचा शोध यांची गरज मानवी जीवनात कशी निर्माण होते, याची त्यांनी मीमांसा केली. या सर्वांच्या पलीकडे जाण्यासाठी मानवी जीवनात असलेली सजग अवधानाची गरज त्यांनी सातत्याने प्रतिपादिली. परंतु सत्याप्रत जाण्याचा कोणताही मार्ग नाही, हेच सत्याचे खरे सौंदर्य आहे. अशा या थोर तत्त्वज्ञाचे १७ फेब्रुवारी १९८६ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# छातीत पित्ताचे आंबट ढेकर मिनिटात थांबवते 'हे' पाणी

ॲसिड रिफ्लक्स हे पोटाच्या सामान्य समस्यांपैकी एक आहे आणि त्याला छातीत जळजळदेखील म्हणतात. जेव्हा तुमच्या पोटातील हायड्रोक्लोरिक ॲसिड तुमच्या अन्ननलिकेमध्ये प्रवेश करते, म्हणजेच पोटातील ॲसिड अन्ननलिकेमध्ये परत जाते तेव्हा ही समस्या उद्भवते. या क्रियेला गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्सदेखील म्हणतात. जेव्हा असे होते तेव्हा छाती आणि घशात जळजळ जाणवते. या पोटाच्या समस्येची अनेक कारणे असू शकतात.



नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनच्या अहवालानुसार, ॲसिड रिफ्लक्सवर उपचार न केल्यास काही वेळा गंभीर परिणाम होऊ शकतात. ॲसिड रिफ्लक्सच्या समस्येवर उपचार करण्यासाठी अनेकदा घरगुती उपाय देखील फायदेशीर असल्याचे दिसून आले आहे. त्यापैकीच एक आहे लिंबू पाण्याचा उपाय!

घशात जळजळ होणे, पोटाच्या वरच्या भागात अस्वस्थता जाणवणे, आम्लपित्त, जीभ आणि घशात वेदना, पोटात जास्त गॅस तयार होणे, छातीत दुखणे, अन्न गिळताना त्रास होणे ही त्याची काही प्रमुख लक्षणे आहेत.

ॲसिड रिफ्लक्सची अनेक कारणे असू शकतात, जसे की चुकीच्या वेळी खाणे, लठ्ठपणा, जास्त तेलकट आणि मसालेदार अन्न खाणे, धूम्रपान इ. याव्यतिरिक्त, कॅल्शियम चॅनेल ब्लॉकर्स, बीटा-ब्लॉकर्स आणि नायट्रेट्स सारखी काही औषधे देखील ॲसिड रिफ्लक्स वाढवू शकतात.

पोटाच्या अनेक समस्यांवर लिंबू पाण्याचे सेवन फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. हे ॲसिड रिफ्लक्सची लक्षणे कमी करण्यासाठी देखील उपयुक्त आहे. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते, ज्याला एस्कॉर्बिक ॲसिडदेखील म्हणतात. हे एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे, जे अन्न लवकर पचण्यास मदत करते, ज्यामुळे ॲसिडिटीची समस्या टाळते. लिंबू पाण्याचे सेवन केल्याने ॲसिड रिफ्लक्समुळे होणाऱ्या पेशींच्या नुकसानापासून संरक्षण करण्यासाठी देखील मदत होते.

ही समस्या टाळण्यासाठी आणि अन्न सहज पचण्यासाठी, जेवण करण्यापूर्वी २० मिनिटे आधी लिंबू पाणी प्या. जेणेकरून ते प्यायल्याने ॲसिड रिफ्लक्सची लक्षणे टाळता येतील. यासमुळे तुमचे अन्न लवकर आणि व्यवस्थित पचते.

हे करण्यासाठी तुम्हाला एक ग्लास पाण्यात एक चमचा लिंबाचा रस, थोडासा आल्याचा रस आणि काळे मीठ मिसळावे लागेल. हे सर्व घटक तुमच्या पचनासाठी चांगले असतात.

# खोपोलीत रहिवासी इमारतीत दारूचे दुकान; रहिवाशांची सह्यांची मोहीम




**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली येथील रेल्वेस्थानकासमोरील अरिहंत दोन इमारतींमध्ये देशी दारू दुकानामुळे या परिसरात तळीरामांची वाढती संख्या पाहता या इमारतीमधील व परिसरामध्ये विशेषतः महिलांना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. संबंधित विभागाने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

पूर्वी मुख्य स्टेशनवरील अरिहंत टॉवर तळमजल्यावर देशी दारूचे दुकान सुरू होते, परंतु मुख्य स्टेशनवरील येणाऱ्या जाणाऱ्या रहिवाशांच्या वाढत्या तक्रारी पाहता त्या ठिकाणी ते दुकान बंद करण्यात आले, पण तेच दुकान पुन्हा अन्य रहिवासी इमारतीत स्थलांतर करण्यात आले. याबाबत इमारतीमध्ये रहिवाशांनी सह्यांची मोहीम राबवून स्थानिक उत्पादन शुल्क विभागाला तक्रार दिली. या बारसमोरून स्टेशनचा छोटा रस्ता जात आहे. प्रवासी जवळचा रस्ता म्हणून या रस्त्याचा वापर करतात, पण या परिसरात तळीरामांची वाढती संख्या पाहता महिलांना असुरक्षित वाटते.

दरम्यान, भाजपचे युवा नेते संजय तना यांनी उत्पादन शुल्क खात्याचे आयुक्त यांनाही यासंदर्भात पत्र पाठवले, परंतु अद्यापही त्याबाबत कुठलीही कारवाई झाली नसल्याचे संजय यांनी सांगितले. या परिसरात नेहमी तळीरामांची भांडणे पाहता रहिवाशांना इमारतीत राहणे गैरसोयीचे वाटत आहे. याबाबत स्थानिक आणि संबंधित विभाग कार्यालयावर उग्र आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे.

# शिवचरित्र प्रसार अश्वमोहिमेचा महाडमध्ये समारोप



**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास, युद्धकला व अश्वज्ञान तरुणांमध्ये पोहोचावे यासाठी शिवचरित्र प्रसार अश्वमोहीम सुरु करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी ते समाधी स्थळ असलेले किल्ले रायगडपर्यंत ही मोहीम आखण्यात आली होती. शिवस्मारक समिती महाड व शिवसेना शिंदे गट यांच्या वतीने महाड येथील भिलारे मैदान या ठिकाणी गोवा राज्याचे क्रीडा व सांस्कृतिक मंत्री रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत याचा सांगता समारंभ संपन्न झाला. यावेळी अश्वस्वारांनी वेगवेगळी कौशल्य दाखवून महाडकरांची मने जिंकली.

सांस्कृतिक कार्य विभाग तथा सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिग्विजय प्रतिष्ठान आयोजित शिवचरित्र प्रसार अश्वमोहीम राबविण्यात आली. रोहिडेश्वर येथे स्वराज्याची शपथ ३८१ वर्षपूर्तीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरी ते स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडदरम्यान पंचवीस गडकिल्ल्यांवरून अश्वमोहीम राबविण्यात आली.

सांगता समारंभ भिलारे मैदान येथे शिवस्मारक समिती महाड व शिवसेना शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी गोवाचे सांस्कृतिक मंत्री रमेश तवडकर, नगराध्यक्ष सुनील कविस्कर, अजय पुरकर, हभप अवधूत गांधी, गुणेश पुरंदरे, अभिनेत्री अस्मिता शेवाळे, शिवस्मारक समितीचे थोरात, भाजप नगरसेवक सुमित पवार, महाड शहर संपर्कप्रमुख सिद्धेश पाटेकर, महाड शहर प्रमुख डॉ. चेतन सुर्वे, नितीन पावले, नगरसेविका विद्या देसाई, नगरसेविका पूजा गोविलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते, की, मौजेः चिरनेर, ता. उरण, जि. रायगड येथिल संमतीपत्र लिहून देणार (दुसरेपक्षी) **१. श्रीमती. गुलाब आत्माराम तांडेल २. श्रीमती. कासूबाई कमलाकर पाटील ३. श्रीमती. निर्मला पांडुरंग पाटील ४. श्रीमती. मंजुळा तुकाराम पाटील** 5. **श्रीमती विजया निळकंठ जोशी** व्यक्तीच्या नावे असलेले ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची खालील वर्णनाची शेत जमीन आमचे आशिल संमतीपत्र लिहून घेणार (एकपक्षी) **१. श्रीमती. विद्या सचिन फुलपगार २. श्रीमती. अचला लक्ष्मी प्रसन्ना** यांनी कायम स्वरूपात विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिरनेर, ता.उरण, जि. रायगड**

| अ.क्र. | गट नंबर/सर्व्हे नं | भू-धारणा पध्दती | क्षेत्र-हे.आर. पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | २४६/१ | भोगवटादार वर्ग २ | ०.३२.५० पो. खराबा ००३.५० एकूण ०.३६.०० | ५.१३ |

सबब वर नमूद शेतजमीन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून 21 दिवसांच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून कोही लेखी हरकत तकार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाररहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तकार दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांकः ०९/०५/२०२६

सही/-
**ॲड. सविता एस. नागोठकर/म्हात्रे**
पत्ता : पोष्ट -चिपळे,
माथेरान रोड पनवेल रायगड **४१०२०६**
मो. **९०८२३४४१८०**

# खारआंबोली कालव्याच्या कामाने घेतली गती

**मुरुड : प्रतिनिधी**

आंबोली धरण लघु पाटबंधारे प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा व डावा तीर कालव्याच्या कामाची रखडपट्टी प्रदीर्घ काळ झाली असली तरी पाटबंधारे विभागाने प्राधान्याने मार्च २०२५ पासून कालव्याचे काम पुढे रेटून नेण्याचा प्रयत्न केल्याने शेतकरी वर्गाला दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांनी सहकार्य केले तर मे २०२६अखेर नियोजित उजवा तीर कालवा व डावा तीर कालवा पुर्ण होईल अशी खात्री पाटबंधारे खात्याने दिली आहे.

१० वर्षांपासून रखडलेल्या कामास सुरुवात होऊन प्रकल्प पूर्ण होणार यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. कालव्याचे काम नियोजित वेळेप्रमाणे पूर्ण झाले तर पुढील खरीप हंगामानंतर उन्हाळी भातशेती धरणाच्या पाण्यावर पिकवता येईल अशी अपेक्षा शेतकरी वर्ग करीत आहे. शेतीला पुरेसे पाणी उपलब्ध झाले तर भात उत्पादन क्षेत्र वाढीस मदत होऊ शकेल.



### शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

***मुरुड आंबोली तीर कालव्याचे काम सुरू करण्यात आल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. आंबोली उजवा तीर कालव्याची लांबी ७.१० किमी, तर डाव्या तीर कालव्याची लांबी २.६४ किमी. इतकी असून आतापर्यंत उजवा तीर कालव्याचे काम सुमारे ५ किमी इतके पूर्ण झाले आहे. सायगाव हद्दीतून पुढे तेलवडे ग्रामपंचायत हद्दीपर्यंत उजवा तीर कालवा अपेक्षित आहे. डाव्या तीर कालव्याचे काम दोन किमी पूर्ण झाले असून आंबोली गावाच्या वेशीपर्यंत पाईपलाईन पोहचली आहे.***

मुरूड शहरालगत १० कि.मी. परिसरात अन्यत्र आंबोलीच्या इतके साठा क्षमतेचे दुसरे धरण नाही. नबाबकालीन गारंबी धरणातून आज ही गुरुत्व पद्धतीने पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांना जिरायत शेतीवरच अवलंबून राहावे लागत आहे. धरण क्षेत्रात प्रचंड जलसाठा असूनदेखील कालव्याअभावी दुपिकी पिकांपासून शेतकरी वर्ग वंचित आहे.

# ज्येष्ठ पत्रकार दीपक जगताप यांना पुरस्कार

**खालापूर : वार्ताहर**

खालापूर तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार दीपक मारुती जगताप यांना उत्कृष्ट पत्रकार हा रायगड जिल्हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. साईबाबा मंदिर साईधाम, बिजघर (ता. खेड, जि. रत्नागिरी) येथे आयोजित ३०व्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात त्यांचा गौरव करण्यात आला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन साईबाबा मंदिर बिजघरचे प्रवर्तक तथा मराठा क्रांती स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सदानंद भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमास अध्यक्ष विजय कदम, सरचिटणीस प्रदीप मोरे, राज्यध्यक्ष गुरुनाथ यशवंतराव, सरचिटणीस प्रकाश चव्हाण, मुंबई प्रदेशाध्यक्ष डॉ. चंद्रकांत मोजाड, मीडिया अध्यक्ष अभिजित दरेकर, कोकण प्रदेशाध्यक्ष महेंद्र भोसले, रत्नागिरी जिल्हा संपर्कप्रमुख महेश मोरे, जिल्हाध्यक्ष कृष्णा शेलार, खेड तालुकाध्यक्ष श्रीराम कदम आदी उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
## अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल

दुसरा मजला प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, आद्य क्रांतिकार वासुदेव फडके नाट्यगृहच्या समोर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६ E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र.मशा/फौजदारी/कात-८/ मृत्यू ९१९/२०२६ दिनांक : ०८/०५/२०२६

**"नोटीस"**

**विषय:- उशिरा मृत्यू नोंद करणेबाबत.**

**संदर्भ :- अर्जदार श्री. राम भुऱ्या कातकरी, यांचा दि.०५/०३/२०२६ रोजीचा अर्ज.**

उपरोक्त विषयाकामी अर्जदार **श्री. राम भुऱ्या कातकरी , रा.भेरले ता.पनवेल, जि.रायगड** यांनी त्यांचे वडील कै. भुऱ्या हडक्या कातकरी यांची उशिरा मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेकामी अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल यांच्या कार्यालयाकडे अर्ज केला आहे.

प्रकरणी सदर अर्जाकामी दिनांक ०५/०६/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता या कार्यालयाकडे सुनवनी ठेवण्यात आलेली आहे. सबसब सदर मृत्यू नोंदीस आपली हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरुपात अप्पर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचेकडे सुनवणी पुर्वी सादर करावी. सुनवणी नंतर हरकत प्राप्त झाल्यतास मान्य करण्यात येणार नाही . हरकत प्राप्त न झाल्यास आपणांस काही एक सांगायचे नाही हे गृहीत धरुन अर्जदार यांच्या अर्जाकामी पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
(सारंग राठोड)
महसूल सहाय्यक,
अप्पर तहसिलदार कार्यकारी, पनवेल

# वारंवार खंडित पुरवठ्याबाबत कर्जतकरांचा महावितरणला घेराव

**कर्जत : प्रतिनिधी**

वाढत्या उकाड्यात वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी सोमवारी सकाळी कर्जत येथील महावितरण कार्यालयावर घेराव घालत तीव्र संताप व्यक्त केला. कर्जत तालुका वीज ग्राहक संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

या आंदोलनाला सामोरे जात महावितरणचे उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत केंद्रे यांनी कार्यालयाबाहेर येऊन नागरिकांशी चर्चा केली. यावेळी अॅड. कैलास मोरे, रंजन दातार यांच्यासह अनेक नागरिकांनी सतत वीज जाणे, वारंवार शटडाऊन, चुकीचे मीटर रीडिंग, वाढीव वीजबिले आणि कर्मचाऱ्यांकडून होणारी अरेरावी याबाबत जाब विचारला. वीजपुरवठा खंडित झाल्यास नागरिकांना तत्काळ माहिती मिळावी. यासाठी स्वतंत्र संपर्क क्रमांक आणि माहिती केंद्र सुरू करण्याची मागणीही करण्यात आली. ऑगस्ट २०२४ मध्ये याच मागण्यांसाठी आठ दिवस साखळी उपोषण करण्यात आले होते.



# रवींद्र कालगुडे वाळण विभाग नायक मराठा समाज अध्यक्षपदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील वाळण बुद्रुक गावचे रहिवासी रवींद्र कृष्णा कालगुडे यांची नुकतीच वाळण विभाग नायक मराठा समाज अध्यक्षपदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल रायगड शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित न्यू इंग्लिश स्कूल वाळण बुद्रुक हायस्कूलमधील सन १९८८-८९ इयत्ता १०च्या बॅचमधील त्यांच्या वर्गमित्रांकडून पुढील वाटचालीस बहुमोल अशा हार्दिक शुभेच्छा देण्यात येत आहेत.



रवींद्र कालगुडे यांनी न्यू इंग्लिश स्कूल वाळण बुद्रुक येथे सन १९८८मध्ये आपले दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते नोकरी अथवा व्यवसाय करण्याकरिता कोणत्याही शहरात गेले नाही. त्यांनी आपला वडिलोपार्जित असलेला शेतीव्यवसाय करीत आपल्या आयुष्याची जडणघडण केली. कालगुडे यांना दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या तिन्ही मुलांचे लग्न झाले असून ते सामाजिक, राजकीय कार्य करीत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत समाजाने त्यांची नायक मराठा समाज अध्यक्षपदी निवड केली आहे. शाळेचे आपल्या आयुष्यातील अनन्यसाधारण स्थान आहे. शालेय जीवनातील आठवणी कायमस्वरुपी स्मरणात राहतात. याच आठवणींना उजाळा देण्यासाठी पुन्हा आपले बालपण आठवण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूल वाळण बुद्रुक हायस्कूलमधील १९८८-८९ इयत्ता १०च्या बॅचमधील विद्यार्थी तब्बल ३५ वर्षांनंतर वयाची ५०शी ओलांडलेले सर्व शाळकरी मित्र व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून एकत्र येऊन सामाजिक, शैक्षणिक कार्य करीत आहेत.

# माणगावातील साई मंदिराचा वर्धापन दिन

**माणगाव : बातमीदार**

माणगाव येथील साई मंदिराचा १० वा वर्धापन दिन शनिवार ९ मे रोजी भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आदर्शसमता नगर रहिवासी मंडळाच्या वतीने आयोजित या उत्सवाला महिला भगिनींसह भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उत्सवाची सुरुवात पहाटे काकड आरतीने करण्यात आली. त्यानंतर पंचारती तसेच होम-हवन पूजेचे आयोजन करण्यात आले. दुपारच्या सत्रात साईभंडाऱ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी अनेक भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.





सायंकाळी साईबाबांच्या पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. साई मंदिर ते गजानन महाराज मंदिर आणि पुन्हा साई मंदिर असा पालखी मिरवणुकीचा मार्ग होता. "साईराम" नामाच्या गजरात, लेझीम, टाळ-मृदंग आणि भजनांच्या सुरांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या भक्तिभावाने पालखी मिरवणुकीत सहभाग घेतला. रात्री धूपारतीनंतर भजन कार्यक्रमाने उत्सवाची सांगता करण्यात आली. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांनी परिसरात भक्तीमय आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी साईंच्या मूर्तीच्या चेहऱ्यावर जणू प्रसन्नतेचे भाव उमटले असल्याची भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. संपूर्ण परिसर साईराम नामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता.

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन **२०२६** ते **२०३१** या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव अधिराज सामयामा टॉवर **१** ए सह. गृह. संस्था मर्या.. रोहिजण, ता. पनवेल, जि. रायगड., असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. **१३/०५/२०२६** ते **१९/०५/२०२६**, नामनिर्देशन पत्र छाननी दि. **२०/०५/२०२६**, नामनिर्देशन पत्र माघारी दि.**२२/०५/२०२६** ते **०५/०६/२०२६** व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक **१४/०६/२०२६** रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहीती तालुका सहकारी निवडणूक अधिकारी कार्यालयामध्ये पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुरेखा पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना, तसेच, बँका, पतसंस्था, वित्तीय संस्था यांना माझे अशील रणजित सुरेश मोडे, रा- कोथरुड, पुणे यांनी दिले माहिती व अधिकारावरुन व दाखविले कागदापत्रांवरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन :** जिल्हा तुकडी रायगड, पोट तुकडी व तालुका पनवेल तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या हद्दीतील, पंचायत समिती पनवेल यांच्या व मे. सब रजिस्ट्रार पनवेल यांचे अधिकार क्षेत्रातील मौजे खारघर तलाठी सजा कामोठे ता. पनवेल, जि.रायगड येथील रेव्हेन्यु रेकॉर्डमधील सर्व्हे नंबर १५९ हिस्सा नं. १/अ क्षेत्र ०.२२.२ हे. आर. पो. इतके असून, यांचा आकार २.०० रु. पैसे आहे. खाते कमांक १३५ आहे.

२) वरील कलम १ मधील नमुद केलेली मिळकत ही संतोष काशिनाथ गायकर वगैरे यांचे वडिलार्जित मालकीची कुळ कायदा कलम १९४८ चे कलम ४३/६३ अन्वये मालकी हक्कांची भोगवटदार वर्ग- १ ची आहे. सदर मिळकतीचे ७/१२ रेकॉर्ड मध्ये संतोष काशिनाथ गायकर वगैरे सर्व कुटुंबीयांची मालकी हक्कांस नावांची नोंद झालेली आहे सदर गायकर कुटुंबाची स.नं. १५९ / १ मध्ये एकूण क्षेत्र ०.५८.२ हे आर पॉ. इतके होते.या क्षेत्रापैकी विशेष भुसंपादनात हे आर पॉ. इतके क्षेत्र आरक्षित करणेत आले असून,सध्या ०.२२.२ हे आर पॉ. इतके क्षेत्र संतोष काशिनाथ गायकर ०.३६.२ यांचे व त्यांचे सर्व कुटुंबीयांचे नांवे शिल्लक राहिलेली असून, त्याचा फेरफार क्रमांक २८७० दिनांक २८/०८/२००७ मध्ये मेट्रो सेंटर नं.३ पनवेल यांचे कडील आदेश क्र. हद्दनोंद/कात- ४/१०८२७ दिनांक २७/०८/२००७ अन्वये नोंद होवून त्यामध्ये ७/१२ वेगळा होवून १) सन १५९ / १अ क्षेत्र ०.२२.२ आकार २.०० हे क्षेत्र मुळ मालकास होणेस राखून ठेवले असून, २) सन. १५९/१ब क्षेत्र ०.३६.२ आकार २.५० हे क्षेत्र सिडको कडे संपादन करणेत आले असून, दोन ७/१२ वेगळे करणेत आलेले आहेत.

३) वरील कलम १ मधील मिळकत स.नं. १५९/१/अ क्षेत्र ०.२२.२ हे. आर. पॉ. हे क्षेत्र मालक संतोष काशिनाथ गायकर व त्यांचे सर्व कुटुंबीय तसेच त्यांचे वटमुखत्यारधारक यांचे प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे. सदर मिळकत आमचे अशिल खरदी घेणार आहेत व त्या आधारे सदर व्यवहार निश्चित झाला आहे. मिळकत मालक यांनी सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी,निष्कर्जी, तसेच क्लिअर व मार्केटेबल टायटलने युक्त असून, कोणत्याही न्यायालयात तसेच कोणत्याही शासकीय निमशासकीय कार्यालयात वाद विषय नसलेली मिळकत आहे. याबाबत निर्वाळा दिलेला आहे. तथापि, सदर मिळकतीबाबत कोणाचाही गहाण, कर्ज, दान, बक्षीस, तारण, पोटगी, बोजा, जप्तीसुचक खरेदीकरार, भाडेपट्टा, अगर मालकी हक्क हितसंबंध वारस हक्क दावा अॅटेंचमेंट असलेस सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे मुदतीत माझे खालील पत्यावर कागदोपत्री पुरव्यानिशी हरकत नोंदवावी. अशी कोणतीही हरकत मुदतीत न आलेस याबाबतीत कोणाचीही हरकत व म्हणणे नाही असे समजून आमचे अशिल हे वर कलम १ मध्ये नमूद मिळकतीबाबतचा खरेदीपत्राचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही तक्रार आमचे अशिलांचेवर लागू व बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी म्हणून दिली जाहीर नोटीस असे.

**खारघर, ता.पनवेल.**
**दिनांक : ०५/०५/२०२६**
**ॲड. धनपाल एस्. यळमंते**
**जिल्हा व सत्र न्यायालय-या रूम नं.५, विजयनगर, सांगली.**
**मु.पो. लिंगनूर, ता. मिरज, जि. सांगली. .**
**9422613791/9158977491**

## Public Notice

Hon'ble Ugale Court
Advocate for Applicant - Adv. Navin V. Dhongadi

**IN THE HON'BLE COURT OF DISTRCT JUDGE, PANVEL, DISTRICT-RAIGAD**

Civil. M.A No. 34 of 2026
Exh. No. 7/D

Mr. Jayanta Dey ]
S/o Hirenda Chandra Dey ]
Aged 46 years, Hindu, Indian Inhabitant, ]
Occupation Service ]
R/at: Flat No.A-05, Mora Road, ]
Grindwell Campus, Mora Uran, Uran, ]
Dist- Raigarh - 400702 ] ... Applicant

**VERSUS**

NIL ].....Respondent

To all concerned, this public notice serves to inform that the applicant has filed an application u/s 8 of The Hindu Minority and Guardianship Act, 1956, in this Hon'ble Court to be declared as the guardian of the minor Sriyan Jayanta Dey, concerning the following property:

***Description of the Property:***

***"Flat No.303, 3rd Floor, Building No.11, admeasuring area 50.07 Sq. mtrs. Carpet, i.e. 538.95 sq. feet Carpet, Usable Balcony 5.33 sq.mtr. i.e. 57.37 sq. feet, in Hill View Apartment, at Survey No.34/1, 36/5, 120, at Village Mohape, Tal. Panvel, Dist. Raigarh 410221".***

In the above-mentioned Flat no. 303, the applicant Mr. Jayanta Dey S/o Hirenda Chandra Dey has a 75% share, and minor Sriyan Jayanta Dey has 25% share

The applicant has filed this application in this Hon'ble Court to obtain the permission to sell the share of the minor namely Sriyan Jayanta Dey in the aforementioned property. Therefore, if anyone has any objection to the applicant being granted sale permission, they should submit their objection within 30 days from the date of publication of this notice. If no objection is received within the stipulated period, the applicant will be granted the permission to sell the share of the minor after recording legal evidence. All concerned should take note.

GIVEN under my hand and seal of the Court this 11 day of May, 2026.

Sd/-
jr.clerk

COURT STAMP

Sd/-
**Asst. Superintendent**
Additional District Court
Raigad, At Panvel

# सीवूड्समधील उद्यान, जुने गटार, कचराकुंडीच्या कामात अनियमितता

## उपाध्यक्षांचे चौकशीचे आदेश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील बेलापूर विभागा अंतर्गत सिवुडस मधील सेक्टर ४८ येथील उद्यान ,सेक्टर ५० येथील जुने गटार व कचरा कुंडीच्या कामात झालेल्या अनियमिता बाबत सबंधित दोषी अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, या प्रकरणी चौकशी करून जे ठेकेदार दोषी असतील त्यांना काळया यादीत टाकून त्यांच्याकडून अपव्यय झालेल्या मनपाच्या रक्कमेची वसुली करावी असे आदेश २१ एप्रिल रोजी विधान भवन येथे झालेल्या बैठकीत महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष आण्णासाहेब बनसोडे यांनी नवी मुंबई पालिका प्रशासन यांना दिले असल्याची माहिती सोमवारी नेरूळ – सिवुडस येथे राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टी , (अजित गट)नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष व माजी नगरसेवक भरत जाधव यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

सदर बैठक महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीत चौकशी अधिकारी व नवी मुंबई अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी दिलेल्या अहवालानुसार ,सिवुडस सेक्टर ५० मधील जुने गटार कामात अनियमितता , गटार स्थळ पाहणी केली असता सदर रस्ता एका बाजूला उताराचा असून उताराच्या बाजूने पूर्वीचे गटार व फुटपाथ बनविण्याचे निर्दर्शनास आले , तरीदेखील रस्त्याच्या विरुद्ध बाजूला गरज नसताना चुकीच्या पद्धतीने गटार निर्माण करण्यात आले आहे. गटार कामात किती खर्च आला याची माहिती उपलब्ध नाही. उद्यान कामात किती रॉयल्टी भरण्यात आली याची माहिती उपलब्ध नाही. सदर काम उद्यान विभाग यांच्याशी निगडीत असताना सदर काम अभियंता विभागाने केल्याचे अहवालात निदर्शनास आले आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून एकूण ३३० कचरा कुंड्या बसवण्यात आल्या, प्रत्यक्षात मात्र २८७ कचरा कुंड्या जागेवर उपलब्ध असून एकूण ४३ कचरा कुंड्याचे काय झाले. कचरा कुंड्या हरवल्या किंवा त्या चोरीस गेल्याची तक्रार पोलीस ठाण्यात नाही किंवा त्या डम्पिंग ग्राउंड मध्ये जमा केलेचे अहवालात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

सदर पत्रकार परिषदेत बोलताना भरत जाधव यांनी सांगितले की, याबाबतचा अहवाल नवी मुंबई मनपा प्रशासन यांच्याकडे चौकशी अधिकारी सुनील पवार यांनी २९ ऑक्टोबर २०२५ रोजी सादर करण्यात आला होता.मात्र सहा महिने उलटूनही संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही.

> **नवी मुंबई महापालिका बेलापूर विभागातील उद्यान, गटार आणि कचराकुंडी कामात झालेल्या अनियमितासंदर्भात मनपा आयुक्त यांनी संबंधिताना नोटीसा पाठवल्या असून पुढील कारवाई होईल.**
> **–सुनील पवार,**
> अतिरिक्त आयुक्त,
> नवी मुंबई मनपा

# आमदार मंदा म्हात्रे यांच्या विकासनिधीतून उद्यान सुशोभीकरणासह कामांचे भूमिपूजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार विकास निधी मधून सीबीडी येथील सेक्टर ८ बी अष्टविनायक सोसायटीजवळील उद्यानाचा सुशोभीकरण व विविध कामांचे भूमिपूजन भाजप नेते निलेश म्हात्रे यांच्या उपस्थितीत रविवारी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



यावेळी भाजप नेते निलेश म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, सीबीडी येथील सेक्टर ८बी येथील नागरिकांना व लहान मुलांना फेरफटका मारण्यासाठी व खेळण्याकरिता विकसित उद्यान नसल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत सीबीडी सेक्टर ८ बी येथील अष्टविनायक सोसायटी जवळील उद्यानाचा विकास व सौंदर्यकीकरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये अत्याधुनिक सोलर बँचेस, गजेबो, एलईडी, ग्लोबल टनल, डान्सिंग फ्लोअर लाईट, अत्याधुनिक प्रवेशद्वार, प्रस्तरारोहन भिंत, एफ आर पी भिंत, सेल्फी पॉइट, गोबो आणि वेब प्रकारातील थीम उभारणे अशा विविध प्रकारचे लायटिंग शो उभारण्यात येणार असून नवी मुंबईतील एकमेव असे नाविन्यपूर्ण उद्यान निर्माण होणार आहे. त्यामुळे येथील सीबीडीवासीयांना सुंदर असा एक मॅजिक गार्डन पहावयास मिळणार आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी भाजप नेते तथा माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांच्या समवेत नगरसेवक डॉ. जयाजी नाथ, नगरसेविका सुरेखा नरबागे, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ता गोपाळराव गायकवाड, बलबीरसिंग चौधरी, समाजसेवक अशोक नरबागे, बेलापूर मंडळ अध्यक्ष अजय सिंग, दर्शन भारद्वाज, संजय ओबेरॉय, हस्तीमल जैन, राजू कोळी, भूषण ठाकूर, निलेश पाटील, अजय पासवान, जयराम पासवान, नितीन सोनावणे, किसन राठोड, एजाज खान, अल्ताफ धुरु, मनोज भगत, किशोर पाटील, निळकंठ कोळी, किरण वर्मा, आरती राउळ, देवयानी मुकादम, माधुरी सावंत, रेखा गोदाम, मीना ओझा तसेच सीबीडीतील अनेक नागरिक उपस्थित होते.

# बेलापूर येथे सकल हिंदू समाजातर्फे हिंदू संमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथील श्री गणेश विसर्जन अमृतेश्वर तलाव या ठिकाणी सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या कार्यक्रमादरम्यान हिंदू पारंपारिक पद्धतीने प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम याचा समावेश होता.

भारतीय संस्कृतीवर आधारित कथक भरतनाट्यम त्याचप्रमाणे पोवाडा गीत यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये अवधेश वर्मा समन्वयक गायत्री परिवार नवी मुंबई यांनी हिंदू धर्म आणि त्यामधील



संस्कार यांचे महत्त्व स्पष्ट करून सांगितले. ज्याप्रमाणे दुधा सारख्या पदार्थावर संस्कार केल्यानंतर त्याचे दही आणि त्याचे तूप केल्यानंतर त्याचे महत्त्व वाढते मूल्य वाढते त्याचप्रमाणे मानवावर केल्या गेलेल्या संस्कारामुळे त्याचे महत्त्व आणि मूल्य वाढत असल्याचे म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या प्रमुख शितल निकम यांनी हिंदू समाजासमोर असलेल्या अनेक आव्हानांचा परिचय उपस्थित लोकांना करून दिला. त्यामध्ये लव जिहाद, पर्यावरण समस्या, समरसता, आपल्या संस्कृतीतील महान पुरुषांचे चरित्रांचे वाचन, धर्मग्रंथांचे पठण शास्त्राचे महत्व त्याचप्रमाणे नवीन पिढीला कुटुंब प्रबोधन करताना जल, जंगल व जमीन यांची सुरक्षा आणि रक्षण करण्याचे महत्त्व पटवून देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

नवी मुंबईदेखील लव्ह जिहादच्या अनेक घटना घडलेल्या आहेत याची सविस्तर उदाहरणे त्यांनी उपस्थितांना पटवून दिली. कार्यक्रमाचा शेवट नर्मदा आरतीने करण्यात आला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकल हिंदू समाज बेलापूरचे प्रमुख पांडुरंग नाईक, गौरव जोशी, प्रमोद जोशी, जगदीश जैन, कुंदन म्हात्रे, विज्ञान म्हात्रे, स्वाती घैसास, राजेंद्र पटेल, मुक्ता नायर, माधुरी जोशी अशा अनेक लोकांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सांगता अमृतेश्वर तलावासमोर नर्मदा आरतीने झाली

कार्यक्रमात उपस्थित बेलापूर नगर संघचालक डॉ. श्री विवेक येळगावकर, संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान ,नवी मुंबईचे अध्यक्ष तुषार मुखर्जी हे विशेष अतिथी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छाया तेली यांनी केले.

# नेरूळमध्ये घराचे प्लॅस्टर कोसळले



**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर २ येथील आदर्श सोसायटीत सिरोच्या घरांचे प्लास्टर कोसळण्याची घटना शनिवारी सायंकाळी ५ च्या दरम्यान घडली. या घराचा स्लॅब देखील डळमळीत झाला असून तो देखील कोसळण्याची भीती वर्तविण्यात येत आहे.

नेरूळ सेक्टर २ आदर्श सोसायटीतील लिंबाजी नेटके यांच्या ई/०१/०८/ए-०५ या निवासस्थानाच्या हॉलमधील प्लास्टर अचानक कोसळले. यात सोफ्याचे तसेच फर्निचरचे नुकसान झाले. घरात नेटके यांच्या पत्नी व मुलगी उपस्थित होत्या. प्लास्टरचा काही भाग त्यांच्या अंगावर कोसळला, मात्र त्यांना सुदैवाने दुखापत झाली नाही.

# ईवा पार्टेची "समुद्राच्या लाटांवर स्वप्नझेप"

**नवी मुंबई : बातमीदार**

अथांग समुद्राच्या लाटा अंगावर घेत ठाकुर्ली येथील अवघ्या आठ वर्षांच्या ईवा पार्टे हिने समुद्रातील धाडसी जलतरण करत नवा विक्रम आपल्या नावावर केला आहे. अटल सेतू ते गेट वे ऑफ इंडिया हे तब्बल १७ किलोमीटरचे अंतर ईवाने केवळ २ तास ५२ मिनिटांत पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

ईवाने मंगळवार (दि.५) पहाटे ३ वाजता अटल सेतू येथे समुद्रपूजन करून ईवाने आपल्या जलप्रवासाला सुरुवात केली. महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे निरीक्षक सुनील मयेकर यांच्या उपस्थितीत हा प्रयत्न पार पडला.

पहाटेचा अंधार, समुद्रातील जहाजांची वर्दळ, उंच लाटा आणि पाण्यातील शैवाळ अशा अनेक अडचणींवर मात करत ईवाने आपले ध्येय गाठले.



समुद्रातील प्रदूषणामुळे प्लास्टिकच्या बाटल्या, नारळ, कागद, फुलांचे हार आणि झाडांच्या फांद्या तिच्या मार्गात अडथळा ठरत होत्या तसेच गॉगलमध्ये सतत पाणी जात असल्याने तिला अनेकदा थांबून गॉगल साफ करावा लागला, मात्र या सर्व संकटांवर मात करत ईवाने चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर पोहणे सुरूच ठेवले.

या यशामागे ईवाची गेल्या तीन महिन्यांतील कठोर मेहनत आहे. यश जिमखाना येथे प्रशिक्षक विलास माने यांच्या मार्गदर्शनाखाली ती दररोज तीन तास सराव करत होती. लहान वयातच शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर ईवाने ही उल्लेखनीय कामगिरी करून दाखवली असून, तिची कामगिरी अनेकांसाठी आदर्श ठरली आहे.

दरम्यान, सकाळी ५ वाजून ५२ मिनिटांनी ईवाने गेट वे ऑफ इंडिया गाठताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात तिचे स्वागत केले. ईवाच्या या यशामुळे ठाकुर्ली परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ईवाची ही कामगिरी अनेक मुला-मुलींसाठी प्रेरणादायी ठरत असून तिच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत असल्याचे ईवाच्या वडिलांनी यावेळी सांगितले.

# करंजा मच्छीमार सोसायटीचा मालवण दौरा

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील करंजा येथील मच्छीमार सोसायटी आणि करंजा मत्स्य बंदर हे आज महाराष्ट्रातील मच्छीमारांसाठी प्रगतीचे एक आदर्श केंद्र मानले जाते. मासेमारीसोबत आदर्श व्यवस्थापनासाठी ते ओळखले जाते. शिस्तबद्ध कार्यप्रणालीतून आर्थिक भरभराट हे या सोसायटीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. याचे संचालन पूर्णपणे स्थानिक कोळी समुदायाद्वारे केले जाते. मासेमारी करण्यापासून ते त्यांच्या विक्रीपर्यंत आणि संपूर्ण आर्थिक व्यवहारांचा हिशोब ठेवण्यापर्यंतची सर्व जबाबदारी हे बांधव स्वतः चोखपणे पार पाडतात. हजारो मच्छीमारांना शिस्तबद्ध पद्धतीने काम करता यावे यासाठी तेथील प्रणाली विकसित होत भक्कम आणि उपयुक्त बनली आहे.




या बंदरातून दरवर्षी तब्बल ४५० ते ५०० कोटी रुपयांच्या माशांची विक्री आणि निर्यात होते. करंजा मच्छीमार सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांच्या नेतृत्वाखाली मच्छीमार सोसायटीच्या कार्यकारी मंडळातील काही मंडळी आणि 'ड्रायफ्रूट ग्रुप करंजा'चे सदस्य यांनी कोकण पर्यटनाच्या पंढरीला अर्थात मालवणला भेट दिली. अहोरात्र समुद्राशी नातं राखणाऱ्या या मच्छीमार बांधवांनी त्यांच्या धावपळीच्या आयुष्यातून थोडा वेळ स्वतःसाठी काढला, तोही समुद्राला साक्षी ठेवूनच किल्ले सिंधुदुर्ग व राजकोट येथील छत्रपती शिवरायांच्या भव्य पुतळ्यासमोर हे सर्व दर्यावर्दी नतमस्तक झाले आणि सोबतच मालवण शहर व परिसरातील निसर्गाचा आणि मालवणच्या विशेष आदरातिथ्याचाही त्यांनी भरभरून आनंद घेतला.

करंजा आणि मालवण या दोन्ही ठिकाणच्या मच्छीमार संस्कृतीत बऱ्यापैकी साम्य आहे. कोकणच्या पर्यटनाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मालवणच्या सहलीने दोन्हीकडच्या बांधवांचे जिव्हाळ्याचे नातं हे एकमेकांशी अभ्यासूपणे जोडून राहायची सशक्तता वाढवणारं ठरेल, असंही ड्रायफ्रूट ग्रुप मधल्या सदस्यांनी आवर्जून सांगितलं. या दरम्यान ड्रायफ्रूट ग्रुपच्या सदस्यांनी त्यांच्या सहलीच्या आनंदाला पारंपरिक कोळी नृत्याची जोड देत मालवण उत्साहात साजरे केले.

# आसूडगाव आगाराचा वर्धापन दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम (एन.एम.एम.टी.) अंतर्गत कार्यरत असलेली एन.एम.एम.टी. बस सेवा ही नवी मुंबईकरांची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाते. नवी मुंबई शहरासह ठाणे, मुंबई आणि पनवेल परिसरात दररोज हजारो प्रवाशांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि किफायतशीर सार्वजनिक प्रवासी सेवा पुरवणाऱ्या या उपक्रमाच्या आसूडगाव आगाराचा २१ वा वर्धापन दिन सोमवार (ता. ११) रोजी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

या वर्धापन दिनानिमित्त आगारात सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली होती तसेच उपस्थितांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली होती.



यावेळी आगार परिसरात भक्तिमय आणि आनंदी वातावरण पाहायला मिळाले. एन.एम.एम.टी.ची बससेवा ही केवळ प्रवासाचे साधन नसून नवी मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.

शहराच्या विविध भागांना जोडत प्रवाशांना वेळेत आणि सुरक्षित सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य एन.एम.एम.टी. करत आहे. विशेषतः कामगार, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ही सेवा मोठा आधार ठरत आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका परिवहन समितीचे विद्यमान सभापती विकास झंजाड, परिवहनचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर, मुख्य वाहतूक अधिकारी उमाकांत जंगले, वाहतूक अधीक्षक सुनील साळुंखे, तसेच श्रमिक सेना युनियनचे सरचिटणीस चरण जाधव आगार व्यवस्थापक भगवान भोईर, प्रमुख सल्लागार किशोर पाटील, अध्यक्ष भरत कोळी यांच्यासह युनियन पदाधिकारी आणि चालक, वाहक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिडको एम्प्लॉईज युनियनच्या उपाध्यक्षपदी सुधीर कोळी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको कर्मचारी वर्तुळात कार्यतत्पर, मनमिळावू आणि संघटनात्मक कार्यासाठी ओळख असलेले सुधीर जगन्नाथ कोळी यांची सिडको एम्प्लॉईज युनियनच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सहकारी कर्मचारी, मित्रपरिवार तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.



सुधीर कोळी यांनी यापूर्वीही सिडको आर्टिस्ट कम्बाईनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कर्मचारी एकोप्याचे उपक्रम आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या अनेक योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या होत्या. कर्मचारी वर्गातील संवाद वाढविणे, समस्या समजून घेणे आणि त्यावर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी त्यांनी नेहमी पुढाकार घेतला आहे.

कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर ठाम भूमिका घेताना त्यांनी नेहमीच सकारात्मक संवादावर भर दिला आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गात त्यांच्याबद्दल विश्वास आणि आपुलकीचे नाते निर्माण झाले आहे. नव्या जबाबदारीतून कर्मचारी हिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, संघटनेला अधिक बळकट करणे तसेच कर्मचारी कल्याणासाठी नवीन उपक्रम राबविण्यावर ते भर देतील, असा विश्वास सहकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# गजानन चॅरिटेबल ट्रस्टच्या शाळा दहावीच्या परीक्षेत चमकल्या

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला असून, ऐरोली येथील गजानन चॅरिटेबल संस्थेच्या विविध शाळांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

संस्थेच्या गजानन महाराज माध्यमिक विद्यालय, घणसोली या शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली असून, मदर टेरेसा सेकंडरी कनिष्ठ स्कूल, ऐरोलीने ९४.५० टक्के तर जिजामाता सेकंडरी कनिष्ठ स्कूल, कोपरखैरणे शाळेचा निकाल ९२.३८ टक्के लागला आहे. संस्थेचे सचिव डॉ. वसंत पाटील यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परिश्रम आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरल्याची भावना त्यांनी या वेळी बोलताना व्यक्त केली. तसेच विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचेही त्यांनी कौतुक केले. या उल्लेखनीय निकालामुळे शाळेचे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कोकणचा विकास म्हणजे महाराष्ट्र विकासाचा कणा

## ■ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे प्रतिपादन

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड म्हणजे केवळ जिल्हा नाही तर शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झालेली पवित्र भूमी आहे. स्वराज्याला राजा देणारी ही भूमी आहे. ही प्रत्येक मराठी माणसाची प्रेरणा आणि अस्मिता असलेली भूमी आहे. याच रायगड जिल्ह्यात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि सामाजिक समतेचा नवा इतिहास लिहिला. आजचे काम रोह्याच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. विकास म्हणजे फक्त सिमेंटच्या इमारती किंवा रुंद रस्ते एवढाच नाही तर सामान्य माणसाच्या जगण्यामध्ये कसा फरक पडेल हा आहे. श्रद्धा, संस्कृती पर्यावरण, पर्यटक, रोजगार या सर्वांचा समतोल साधून विकास घडवण्याची आमची भूमिका आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले.





रोहा अष्टमी नगरपरिषद हद्दीतील कुंडलिका नदीकिनारी विविध ठिकाणी पूरसंरक्षक भिंत बांधणे व विविध कामे करणे, रोहा अष्टमी नगरपरिषद कुंडलिका नदी संवर्धन गार्डन येथे खाऊ गल्ली विकसित करणे, रोहा अष्टमी नगर परिषदेकरिता जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्स यांनी तयार केलेले शिवसृष्टी शिल्प कुंडलिका नदी संवर्धन गार्डनमध्ये लावणे, रोहा अष्टमी नगर परिषद हद्दीतील धावीर महाराज मंदिर रोहा येथे भक्तनिवास नूतनीकरण व इतर कामे करणे, रोहा अष्टमी नगर परिषद मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक ७१मध्ये स्वर्गीय दत्ताजीराव ग. तटकरे ब्लड बँक विकसीत करणे आदी कामांच्या भूमिपूजनप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार डॉ. सी.डी. देशमुख सभागृह येथे बोलत होत्या.

कोकण म्हणजे साक्षात देवभूमी निसर्गाने भरभरून दान दिलेली ही भूमी आणि कष्टाळू माणसाने घडविलेली भूमी आहे. आदरणीय दादांचं कोकणावर जास्त प्रेम होतं. कोकणातला माणूस हा साधा आहे प्रामाणिक आहे. मेहनती आहे आणि म्हणूनच कोकणचा विकास हा महाराष्ट्राचा विकासाचा कणा आहे. राज्याच्या विकासाची कुठलीही चर्चा निघाली की आदरणीय दादा नेहमीच कोकणाची बाजू घ्यायचे. इथला शेतकरी, मच्छिमार बांधव, युवक, युवती आणि कोकणी संस्कृती या साऱ्यांविषयी त्यांच्या मनात अपार जिव्हाळा होता. खरोखरच ते मनापासून होतं. कारण कोकणात कधीतरी तटकरेंनी सांगितलं किंवा कुठल्याही लोकांनी सांगितलं तरी ते नेहमीच कोकणात यायला तयार असायचे. कोकणातील लोक त्यांना आवडायची.

या वेळी खासदार सुनील तटकरे, आदिती तटकरे, अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी किसन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, राष्ट्रवादीचे नेते मुश्ताक अंतुले, जि.प. उपाध्यक्ष मधुकर पाटील, प्रदेश सरचिटणीस विजय मोरे, जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे, कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, ॲड राजीव साबळे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, सभापती विजय पाशिलकर, उपसभापती संजय मांडलुस्कर, मुरुड नगराध्यक्ष दांडेकर, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, राष्ट्रवादी महिला जिल्हाध्यक्ष उमा मुंडे, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, स्नेहल जगताप, आराधना दांडेकर, अंकीत साखरे, गटनेते महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, निता हजारे, महेंद्र दिवेकर, संतोष पोटफोडे, समिर शेडगे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला चित्रफीत दाखविण्यात आली. सूत्रसंचालन संजय भुस्कुटे यांनी केले, तर आभार मानताना वनश्री शेडगे यांनी आजचा कार्यक्रम ऐतिहासिक सोहळा मैलाचा दगड आहे, असे सांगितले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने रोहेकर उपस्थित होते.

> “
>
> ***खरंतर आदिती माझी मुलगी. रायगड जिल्ह्यावर माझे पहिले लक्ष असेल ही मी ग्वाही देते. कारण आदिती किंवा तटकरे दादांनंतर वहिनींचे लक्ष असेल की नाही असं त्यांना वाटतंय, पण मी एक जबाबदार महाराष्ट्राची उपमुख्यमंत्री म्हणून आणि कोकणावर माझंही प्रेम असल्यामुळे आणि आदिती आणि तटकरे यांचे अनेक वर्षांचे स्नेहसंबंध असल्यामुळे नक्कीच या विभागावर दादांइतकेच माझंही लक्ष राहील, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आश्वासित केले.***

# माथेरानमध्ये वाढत्या वणव्यांमुळे पर्यावरण धोक्यात



**माथेरान : बातमीदार**

पर्यावरण संवेदनशील आणि घनदाट जंगलांनी वेढलेल्या माथेरान परिसरात सध्या वाढत्या वनव्यां मुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर डोंगरदऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात सुकलेले गवत आणि पालापाचोळा साचलेला असून, वारंवार विविध ठिकाणी वनवे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

रविवार दि.१० रोजी दुपारी तीनच्या दरम्यान अलेक्झांडर पॉइंट लिटिल चौक पॉईंट कड्याला वनवा लागल्याचे दिसून आले अश्या पॉईंट परिसर,दऱ्या,उतार असलेल्या जंगल भागांमध्ये अचानक लागणाऱ्या आगींमुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणीय हानी होत आहे.वनव्यांमुळे केवळ झाडे आणि गवत जळून नष्ट होत नाही, तर त्या भागातील छोटे–मोठे वन्यजीव, पक्षी, सरपटणारे प्राणी आणि जैवविविधतेलाही मोठा फटका बसत आहे. अनेक वेळा आगीच्या विळख्यात अडकून वन्यजीव होरपळून मृत्युमुखी पडत असल्याच्या घटना समोर येत आहेत.जंगलातील नैसर्गिक अधिवास नष्ट होत असल्याने पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत असलेल्या चिंतेनुसार हे वनवे नेमके कशामुळे लागतात अपघाताने लागतात की मानवी निष्काळजीपणामुळे किंवा जाणूनबुजून लावले जातात याबाबत ठोस तपास आणि नियंत्रण यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी वनव्यांबाबत सूचना फलक, जनजागृती मोहीम किंवा तातडीने प्रतिसाद देणारी व्यवस्था अपुरी असल्याचेही नागरिक सांगतात. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी माथेरान वन विभाग तसेच स्थानिक प्रशासनाने अधिक सक्रिय होण्याची गरज व्यक्त होत आहे.

# परतीच्या प्रवासात वाहतूक कोंडी

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकणात गेलेल्या कोकणवासी व पर्यटकांना परतीच्या प्रवासात प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. माणगाव आणि इंदापूर येथील बायपासचे काम अनेक वर्षांपासून रखडलेले असल्यामुळे रविवारी महामार्गावर वाहनांची कोंडी झाली आणि हजारो प्रवाशांना तासन्तास अडकून राहावे लागले. कोकण व तळकोकणातून मुंबईकडे परतणाऱ्या वाहनांचा प्रचंड लोंढा एकाच वेळी महामार्गावर आल्याने माणगाव परिसरात परिस्थिती हाताबाहेर गेली होती.

माणगावपासून महाडकडे जाणाऱ्या मार्गावर तब्बल सहा किलोमीटर पर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यासाठी माणगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी आणि वाहतूक शाखेचे पोलीस उन्हाची पर्वा न करता शर्थीचे प्रयत्न करत होते. काही ठिकाणी वाहतुकीचे मार्ग बदलून वाहनांना पर्यायी मार्गाने सोडण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र वाहतुकीचा प्रचंड ताण इतका मोठा होता की अनेक ठिकाणी वाहने तासन्तास जागच्या जागीच अडकून पडली. कडक उन्हात गाड्यांमध्ये अडकून बसलेल्या प्रवाशांना पाणी, अन्न आणि इंधन, प्रसाधनगृह यांचाही मोठा प्रश्न निर्माण झाला होता. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसल्याचे दिसून आले.



# रेवदंडा समुद्रकिनाऱ्यास पर्यटकांची पसंती; स्वस्त व मस्त टेंट सुविधा, खाद्यपदार्थांचीही चंगळ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्याला मध्यवर्ती असलेला रेवदंडा येथील समुद्रकिनारा पर्यटकांच्या विशेष पसंतीस उतरला आहे. निसर्गरम्य वातावरण, बागायतीमुळे निर्माण होणारे थंड हवामान आणि लांबलचक समुद्रकिनारा यामुळे येथे वर्षभर पर्यटकांची वर्दळ पाहायला मिळते.



उन्हाळ्याच्या सुट्ट्या तसेच आठवड्याच्या शेवटी समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी होत असल्याचे चित्र सध्या दिसत आहे. सकाळपासूनच पर्यटक समुद्रस्नान, फेरफटका व निसर्गाचा आनंद घेण्यासाठी किनाऱ्यावर दाखल होत आहेत. समुद्रकिनाऱ्यालगत नारळ–पाणी, शहाळे व विविध खाद्यपदार्थ विक्रेत्यांचीही चांगली वर्दळ दिसून येत आहे. स्थानिक व्यावसायिकांनाही त्यामुळे रोजगार उपलब्ध होत आहे. रेवदंड्याच्या पश्चिमेस सुमारे दोन किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला असून तो पर्यटकांचे खास आकर्षण ठरत आहे. विशेषतः प्रि–वेडिंग शूटसाठी रेवदंडा बीचला मुंबई, ठाणे, पुणे, बारामती, नाशिकसह महाराष्ट्रातील अनेक फोटोग्राफर्सची पसंती मिळत आहे. निसर्गरम्य परिसर, ऐतिहासिक आगरकोट किल्ल्याची तटबंदी आणि समुद्रकिनाऱ्याचे सौंदर्य यामुळे येथे दररोज प्री–वेडिंग शूटसाठी गर्दी होताना दिसते.

पर्यटकांच्या सोयीसाठी स्थानिकांकडून समुद्रालगतच्या बागायती परिसरात स्वस्त व मस्त टेंट सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच रेवदंडा समुद्रकिनारा सुरक्षित मानला जात असल्याने कुटुंबासह येणाऱ्या पर्यटकांचे हे आवडते पर्यटनस्थळ बनले आहे.

मात्र वाढत्या पर्यटकांमुळे समुद्रकिनाऱ्यावर प्लास्टिक बाटल्या, कचरा व इतर टाकाऊ वस्तूंचा प्रश्न गंभीर बनत आहे. किनाऱ्यावर ठिकठिकाणी पडलेल्या कचऱ्यामुळे परिसराच्या सौंदर्याला बाधा निर्माण होत असून पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे.

# आंब्याच्या बागांचे पावसाने नुकसान



**खोपोली :** तालुक्यात असलेल्या खानाव व खांबेवाडी परिसरात झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक आंबा बागांमधील फळे झाडावरून खाली पडली असून काही ठिकाणी झाडांच्या फांद्याही तुटल्या आहेत. तर काही झाडे मुळासकट उपटले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

आंबे काढण्याची वेळ आली असताना, आता चांगले उत्पन्न मिळेल मात्र अवकाळी पावसाने त्यांच्या आशांवर पाणी फेरले आहे.

# माणगाव येथे मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार १३ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगावजवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा, असे आवाहन माणगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४६ वेळा माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांकडून नेत्ररुग्णांची तपासणी केली जात असून ज्यांना मोतीबिंदू आहे अशा नेत्ररुग्णांना पनवेल येथे आयोजकांच्याच गाडीत घेऊन जाऊन त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करून त्यांना पुन्हा माणगाव येथे आणले जाते.आतापर्यंत ४००० हुन अधिक मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

या शिबिराला दरमहिन्याला नेत्ररुग्णांचा मोठा असा प्रतिसाद लाभत आहे. जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून आपण हे सामाजिक उपक्रम राबवित असल्याचे आयोजक विजयशेठ मेथा यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले. सदर शिबीर यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मेथा परिवारातर्फे विजयशेठ मेथा, मनीष मेथा, विधिता मेथा, सुप्रिया शिंदे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल टीम परिश्रम घेत आहेत.



मुरूड : रायगड जिल्ह्यातील विविध समुद्रकिनाऱ्यांवर सध्या पर्यटकांचा ओघ वाढत आहे. मुरूडच्या समुद्रकिनाऱ्यावरही सुट्ट्यांमुळे अनेक पर्यटक निसर्गाचा आनंद घेताना दिसले. (छाया : सुधीर नाझरे)

# सुनील तटकरे आमचे नेते –सुधाकर घारे

**कर्जत : प्रतिनिधी**

'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम होता, तिथे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेही उपस्थित होते. त्यानंतर तेथूनच मी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झालो. माझ्या नाकाची शस्त्रक्रिया झाल्यानंतर डॉक्टरांनी सांगितलं की, दोन–तीन दिवस कोणाशी बोलू नका, कारण नाकामध्ये दोन्ही बाजूला टाके होते. या कालावधीत समाजमाध्यमांनी सुधाकर घारे पक्षावर नाराज, नॉट रिचेबल असे पसरवले. माझ्या विषयीचा अपप्रचार वाढत चालला म्हणून मी तुमच्याशी संवाद करण्याचे ठरविले. आमचे नेते सुनील तटकरे आहेत. ते योग्य तो माझा सन्मान करतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी व्यक्त केला.




राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. याप्रसंगी राजिप माजी बांधकाम सभापती पुंडलिक पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक भोपतराव, समाज कल्याण सभापती नारायण डामसे, जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, माजी सभापती एकनाथ धुळे, माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, अशोक सावंत, जयवंती हिंदोळा आदींसह नगरसेवक उपस्थित होते.

सुधाकर घारे पुढे म्हणाले की, मी पक्षावर नाराज आहे, पक्षश्रेष्ठींवर नाराज आहे असे कोणाशीही कधी बोललो नाही. फक्त माझी तब्येत बरोबर नसल्यामुळे मला फक्त दोन दिवस माझा फोन बंद ठेवावा लागला होता. म्हणून मी नॉट रिचेबल होतो. मला जर कुठला निर्णय घ्यायचा असता तर मी माझ्या सर्व प्रमुख सहकारी आहेत, सर्व प्रमुख कार्यकर्ते आहेत त्यांना भेटून त्यांच्याबरोबर चर्चा करून तो निर्णय घेतला असता. मी एकट्याने कुठल्या पक्षात जाऊन किंवा कुठला निर्णय घेणार नाही. असे कुठले चुकीचे काम करणार नाही. मी माझ्या पक्षामध्ये आणि माझ्या मतदारसंघातील माझ्या सर्व कार्यकर्त्यांबरोबर खूश आहे. आम्ही सर्वजण एकमताने, एका विचाराने काम करतो. सर्वात महत्त्वाचं म्हणजे आम्ही सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असेल भारतीय जनता पार्टी असेल आणि शिवसेना असेल ते महायुतीच्या माध्यमातून काम करताहेत. शेतकऱ्याला अडचणी तयार होतील तिथे तिथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शेतकऱ्यांच्या बाजूने उभे असू.

आपल्याला विधान परिषदेवर का घेतले नाही? या प्रश्नावर घारे यांनी, मध्यंतरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर मोठा प्रसंग उद्भवला. पक्षाचे नेते अजित पवार यांचा अपघात झाल्यानंतर पक्ष अडचणीत असताना पक्षाकडे मागणी करायची आणि पक्षाला वेठीस धरायचे हे माझ्यासारख्या प्रामाणिक कार्यकर्त्याचे काम नाही. मी कधीही त्या पदासाठी इच्छुक नव्हतो. पक्ष जो निर्णय घेईल तो निर्णय मी मान्य केला, असे त्यांनी सांगितले.

# शेवटच्या चेंडूवर आरसीबीचा थरारक विजय

## मुंबई इंडियन्स प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर

**रायपूर : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाने रायपूरच्या मैदानात शेवटच्या चेंडूवर दोन धावा काढत रोमहर्षक विजय नोंदवला. या सामन्यातील पराभवासह मुंबई इंडियन्सचा संघ यंदाच्या हंगामातील प्लेऑफच्या शर्यतीत बाहेर पडला आहे. अखेरच्या षटकात १५ धावांचा बचाव करण्यासाठी सूर्यकुमार यादवने राज बावावर भरवसा दाखवला. अवांतर धावा खर्च करण्यासोबत मोक्याच्या क्षणी क्षेत्ररक्षणातील चुकांमुळे मुंबईने स्पर्धेत टिकून राहण्याची संधी शेवटची गमावली. क्रुणाल पांड्याने ७३ धावांच्या दमदार खेळीसह आरसीबीच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.



१६७ धावांचा बचाव करताना मुंबई इंडियन्सच्या गोलंदजांनी उत्तम गोलदाजी करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या संघाला बॅकफूटवर ढकलले, पण संघ अडचणीत असताना क्रुणाल पांड्या मैदानात तग धरून उभा राहिला. त्याने ४६ चेंडूत चार चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ७३ धावांची दमदार खेळी करत सामना आरसीबीच्या बाजूने फिरवला. स्नायू दुखापतीमुळे वेदनेने व्याकूळ असताना त्याने अखेरच्या टप्प्यात मोठे फटके खेळत संघाला विजयाच्या समीप नेले. त्याची विकेट मिळवल्यावर सामना पुन्हा मुंबईच्या बाजूने झुकला होता, पण शेवटी १५ धावांचा बचाव करताना युवा गोलंदाज दबाव दिसला. त्याने अवांतर धावा खर्च केल्या. शेवटच्या चेंडूवर जिथे एकही धाव गेली नसती तिथेही चूक झाली आणि आरसीबीने रोमहर्षक सामन्यात बाजी मारली.

तत्पूर्वी पहिल्यांदा फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सची सुरुवात खराब झाली. रायन रिकल्टन दोन धावा काढून माघारी फिरला. रोहित शर्माने दमदार सुरुवात केली, पण १० चेंडूत २२ धावांवर त्याच्या खेळीलाही ब्रेक लागला. दोन्ही सलामीवीरांना भुवनेश्वर कुमारनेच तंबूचा रस्ता दाखवला. एवढेच नाही तर कार्यवाहू कर्णधार सूर्यकुमार यादवला भुवीने खातेही उघडू दिले नाही.

मुंबईचा संघ अडचणीत अताना नमन धीर याने ३२ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ४७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. याशिवाय तिलक वर्माने ४२ चेंडूत तीन चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने केलेल्या ५७ धावांच्या खेळीच्या जोरावर मुंबई इंडियन्सच्या संघाने निर्धारित २० षटकात सात विकेट्सच्या मोबदल्यात १६६ धावा केल्या होत्या. आरसीबीकडून भुवीने सर्वाधिक चार, तर जोश हेजलवूड, रासिक सलाम आणि रोमारियो शेफर्ड यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# भारतीय महिला तिरंदाजांचा सुवर्णवेध

## शांघाय येथील विश्वचषकात यजमान चीनचा धुव्वा

**शांघाय : वृत्तसंस्था**

शांघाय येथे पार पडलेल्या शांघाय तिरंदाजी विश्वचषकात भारतीय महिलांनी ऐतिहासिक कामगिरी करत सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. दीपिका कुमारी, अंकिता भकत आणि कुमकुम मोहद यांचा समावेश असलेल्या भारतीय त्रिकुटाने यजमान चीनचा अटीतटीच्या शूट-ऑफमध्ये पराभव केला. या सुवर्णपदकासह भारताने एकूण दोन पदकांसह शांघाय तिरंदाजी स्पर्धेची सांगता केली.




स्पर्धेत चौथे मानांकन लाभलेल्या भारतीय संघासमोर दुसरे मानांकन असलेल्या आणि घरच्या मैदानात खेळणाऱ्या चीनच्या बलाढ्य संघाचे (झू जिंगयी, हुआंग युवेई आणि यू ची) मोठे आव्हान होते. चार सेट्सचा खेळ पूर्ण झाला, तेव्हा दोन्ही संघ ४-४ अशा बरोबरीवर होते. सामना सुवर्णपदकासाठी असल्याने शूट-ऑफचा थरार पहायला मिळाला. शूट-ऑफमध्ये भारताने संयमी खेळ करत २८-२६ अशा फरकाने विजय मिळवला. अंकिता भकतने नऊ गुणांनी सुरुवात केली, तर कुमकुमने अचूक १० गुणांचा वेध घेतला. शेवटच्या क्षणी विजयासाठी आठ गुणांची गरज असताना अनुभवी दीपिका कुमारीने नऊ गुणांची नोंद करत भारताचे सुवर्णपदक निश्चित केले.




हे सुवर्णपदक या खेळाडूंसाठी वैयक्तिकरीत्याही महत्त्वाचे ठरले आहे. दीपिका कुमारीच्या कारकिर्दीतील हे ३९वे विश्वचषक पदक ठरले. अंकिता भकतने आठव्यांदा विश्वचषक पदकावर नाव कोरले, तर कुमकुम मोहद हिच्या कारकिर्दीतील हे पहिले विश्वचषक आहे.

# कृणाल पांड्याची जिगरबाज खेळी

## सामन्यानंतर मुंबई इंडियन्ससोबतच्या आठवणींना दिला उजाळा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएलच्या ५४व्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा दोन विकेट्सने थरारक पराभव केला. शेवटच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या या सामन्यात विजय मिळवत आरसीबी संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहचला, तर या पराभवासह मुंबई इंडियन्सचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. आरसीबीसाठी जिगरबाज खेळी करणारा कृणाल पांड्या हिरो ठरला. सामना संपल्यानंतर त्याने आपल्या जुना संघ मुंबई इंडियन्सबद्दल भावूक प्रतिक्रिया दिली.



अल्प धावांचा पाठलाग करताना संघ अडचणीत असताना क्रुणाल पांड्या स्नायू दुखापतीने त्रस्त असूनही जिद्दीने लढला अन् संघाला विजय मिळवून देण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. सामन्यानंतर त्याने ज्या मुंबई इंडियन्सला स्पर्धेबाहेर काढण्यात पुढाकार घेतला, त्या संघासोबतच्या जुन्या आठवणींत भावूक झाल्याचेही पहायला मिळाले. धावांचा पाठलाग करताना सामना रंगतदार अवस्थेत असताना कृणाल स्नायू दुखापतीमुळे त्रस्त दिसला. षटकार मारल्यानंतर तो वेदनेने व्याकूळ होऊन मैदानावर पडला, मात्र स्वतःला सावरत पुन्हा उभा राहून त्याने फलंदाजी सुरू ठेवली.

याबद्दल कृणाल म्हणाला की, मला खूप क्रॅम्प्स येत होते. सुरुवात पायापासून झाली. मग पाठीतही वेदना जाणवू लागल्या, पण संघासाठी ते दोन गुण महत्त्वाचे होते. मला कठीण परिस्थितीत फलंदाजी करायला आवडते.

मुंबईच्या विजयातील अडथळा ठरलेल्या कृणाल पांड्याने एकतर्फी झुंज देताना ७३ धावांची जिगरबाज खेळी केली. या खेळीनंतर कृणालने जुन्या फ्रँचायझी संघातील माजी सहकारी किएरॉन पोलार्ड आणि भाऊ हार्दिक पांड्या यांच्याबद्दल आपल्या मनातील भावना व्यक्त केल्या. सामन्यानंतर तो म्हणाला की, पॉली (पोलार्ड) माझा मोठा भाऊ आहे. मुंबई इंडियन्ससोबतची सहा वर्षं माझ्या आयुष्यातील सर्वोत्तम काळ होता. पांड्या ब्रदर्स आणि पोलार्ड हे संघाचे इंजिन रूम होते. पोलार्ड हा एक चांगला माणूस आणि टी-२० क्रिकेटमधील 'गोट' आहे. त्याने अनेक सामने आणि ट्रॉफी जिंकल्या आहेत.

दरम्यान, कृणाल पांड्याने मुंबई इंडियन्सच्या संघाकडून आयपीएल पदार्पण केले होते. २०१७, २०१९ आणि २०२०मध्ये तो आयपीएल विजेत्या मुंबई इंडियन्स संघातील महत्त्वपूर्ण खेळाडू होता. २०२५मध्ये त्याने आरसीबीसोबत आयपीएलची चौथी ट्रॉफी जिंकली. गत हंगामाप्रमाणे यंदाही या संघासाठी सर्वोत्तम कामगिरी करताना दिसत आहे.

# पै. अन्वर बुराण स्मृतीचषक क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ



**अलिबाग : प्रतिनिधी**

झुंझार युवक मंडळ पोयनाड आयोजित मंडळाचे माजी अध्यक्ष पै. अन्वर बुराण यांच्या स्मरणार्थ रायगड जिल्ह्यातील १४ वर्षाखालील मुलांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचा पोयनाड येथील झुंझारच्या क्रीडांगणावर प्रारंभ करण्यात आला. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील आठ संघानी सहभाग घेतला असून स्पर्धा एकदिवसीय ४० षटकांची असणार आहे.

स्पर्धा प्रथम साखळी व त्यानंतर बाद फेरीनुसार आयोजित केली आहे. प्रत्येक सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.

स्पर्धेचा उद्घाटनीय सामना जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग विरुद्ध कोंढाळकर्स क्रिकेट अकॅडमी रिलायन्स लोधीवली या संघांमध्ये खेळला गेला.

स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी झुंझार युवक मंडळाचे सचिव किशोर तावडे, खजिनदार दीपक साळवी, सदस्य अजय टेमकर, तहसीन बुराण, आलीजा बुराण, प्रशिक्षक समीर सुर्वे, जगदीश ढगे, ॲड.पंकज पंडित, चैतन्य राऊत, आदेश नाईक यांच्यासह खेळाडू व क्रिकेटप्रेमी लोकं उपस्थित होते.

# भुवनेश्वर कुमारचा अनपेक्षित षटकार ठरला निर्णायक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्स यांच्यात रंगलेला सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रोमहर्षक ठरला. अत्यंत चुरशीच्या या लढतीत आरसीबीने दोन विकेट्स राखून विजय मिळवला आणि मुंबईला स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवला. एका क्षणी सामना पूर्णपणे मुंबईच्या बाजूने झुकलेला दिसत असतानाच भुवनेश्वर कुमारच्या अनपेक्षित षटकाराने सामन्याचे चित्र पालटले आणि आरसीबीने रोमांचक विजय खेचून आणला.



नाणेफेक जिंकून आरसीबीने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मुंबई इंडियन्सच्या डावात तिलक वर्माने ५१ धावांची संयमी खेळी केली, तर नमन धीरने ४७ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. या दोघांच्या जोरावर मुंबईने निर्धारित २० षटकांत १६६ धावांचा टप्पा गाठला. आरसीबीकडून अनुभवी गोलंदाज भुवनेश्वर कुमारने भेदक मारा करत चार विकेट्स घेत मुंबईच्या फलंदाजीला मोठा धक्का दिला. लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली. पॉवर प्लेमध्येच विराट कोहली, देवदत्त पडिक्कल आणि कर्णधार रजत पाटीदार यांची विकेट्स पडल्याने संघ अडचणीत सापडला. त्यानंतर क्रुणाल पांड्याने एकहाती झुंज देत संघाला सावरले. त्याने संयमी आणि जबाबदारीपूर्ण फलंदाजी करत ७३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. त्याच्या खेळीमुळे आरसीबीच्या विजयाच्या आशा कायम राहिल्या.


अखेरच्या षटकात आरसीबीला विजयासाठी १५ धावांची गरज होती. पहिल्या तीन चेंडूंमध्ये केवळ पाच धावा झाल्याने सामना मुंबईच्या बाजूने झुकला. त्यावेळी क्रीजवर भुवनेश्वर कुमार आणि रासिक सलाम दार होते. त्यामुळे मुंबईचा विजय जवळपास निश्चित मानला जात होता, मात्र चौथ्या चेंडूवर भुवनेश्वर कुमारने अप्रतिम षटकार ठोकत सामन्याला कलाटणी दिली. या एका फटक्यामुळे समीकरण अचानक आरसीबीच्या बाजूने फिरले. त्यानंतर पाचव्या चेंडूवर एक धाव घेतली गेली आणि शेवटच्या चेंडूवर आवश्यक दोन धावा पूर्ण करत आरसीबीने दोन विकेट्सने अविस्मरणीय विजय नोंदवला.

सामन्याचा खरा टर्निंग पॉईंट म्हणजे भुवनेश्वर कुमारने मारलेला चौथ्या चेंडूवरील षटकार. त्या फटक्यापूर्वी मुंबई इंडियन्स विजयाच्या उंबरठ्यावर होती, मात्र एका षटकाराने संपूर्ण दडपण मुंबईवर गेले आणि आरसीबीने संधीचा फायदा घेत अखेरच्या चेंडूवर विजय साकारला.

# सलग दुसऱ्यांदा विराट शून्यावर बाद

**मुंबई : प्रतिनिधी**

रायपूर येथील शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवरील सामन्यात मुंबई इंडियन्सच्या संघाने दिलेल्या अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार बॅटर आणि चेज मास्टर विराट कोहली पुन्हा एकदा शून्यावर बाद झाला. दीपक चाहरने त्याला गोल्डन डकसह तंबूचा रस्ता दाखवला.



आयपीएलमध्ये सलग दुसऱ्यांदा त्याच्यावर खाते न उघडता तंबूचा रस्ता धरण्याची वेळ आली. याआधी लखनऊ सुपर जाएंट्सविरुद्धच्या सामन्यात तब्बल नऊ वर्षांनी या स्पर्धेत शून्यावर बाद झाला होता. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात तो दमदार कमबॅक करेल अशी अपेक्षा होती, पण सलग दुसऱ्यांदा त्याच्यावर शून्यावर बाद होण्याची नामुष्की ओढावली.

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात विराट कोहली आयपीएलमध्ये १२व्या वेळी शून्यावर बाद झाला. आरसीबीच्या संघाक़डून सर्वाधिक वेळा शून्यावर बाद होण्याचा विक्रम त्याच्या नावे आहे. विशेष म्हणजे आयपीएलच्या आतापर्यंतच्या इतिहास दुसऱ्यांदा विराट कोहलीवर एका हंगामात सलग दोन सामन्यात शून्यावर बाद होण्याची नामुष्की ओढावली. याआधी २०२२च्या हंगामात लखनऊ आणि हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याच्यावर ही नामुष्की ओढावली होती.

# आचारसंहिता उल्लंघनप्रकरणी आरसीबीचे प्रशिक्षक दोषी; बीसीसीआयने ठोठावला दंड

**मुंबई : प्रतिनिधी**

मैदानी पंचांच्या निर्णयाला आक्रमकपणे आव्हान दिल्याबद्दल आणि चौथ्या पंचांशी हुज्जत घातल्याबद्दल रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरु (आरसीबी)चे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) त्यांना दोषी ठरवत दंड ठोठावला आहे.

मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यादरम्यान फ्लॉवर आयपीएल आचारसंहितेच्या कलम २.३चे उल्लंघन केल्याप्रकरणी दोषी आढळले आहेत. या गुन्ह्यासाठी आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलने त्यांच्या मॅच फीच्या १५% दंड आकारला आहे.

१८व्या षटकात तिसऱ्या पंचांच्या एका वादग्रस्त निर्णयामुळे आरसीबीला चौकार नाकारण्यात आला. या वेळी फ्लॉवर यांनी दिनेश कार्तिकसह चौथ्या पंचांकडे जाऊन हा निर्णय चुकीचा असल्याचा युक्तिवाद केला. कार्तिकवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसली तरी या संवादादरम्यान फ्लॉवर यांनी मर्यादा ओलांडल्याचे लीगने स्पष्ट केले आहे.

आयपीएलने आपल्या पत्रकात म्हटले आहे की, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे मुख्य प्रशिक्षक अँडी फ्लॉवर यांना खेळाडू आणि संघ अधिकाऱ्यांच्या आयपीएल आचारसंहितेच्या लेव्हल १चे उल्लंघन केल्याबद्दल त्यांच्या मॅच फीच्या १५% दंड ठोठावण्यात आला आहे. त्यांनी कलम २.३चे उल्लंघन केल्याचे मान्य केले आहे, जे सामन्यादरम्यान तोंडी शिवीगाळ करण्याशी संबंधित आहे. १७.२ षटकात फ्लॉवर चौथ्या पंचांशी आक्रमकपणे बोलले. फ्लॉवर यांनी गुन्हा कबूल केला असून मॅच रेफरी अमित शर्मा यांनी दिलेली शिक्षा मान्य केली आहे.

# टिम डेव्हिडच्या 'त्या' कृतीने वेधले लक्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरूचा खेळाडू टिम डेव्हिडचा एक कथित व्हिडीओ व्हायरल होत असून त्यात तो मुंबई इंडियन्सच्या पराभवानंतर वादास्पद खूण करताना दिसत आहे.

सामन्यात टिम डेव्हिड फलंदाजीत हवे तितके योगदान देऊ शकला नाही, पण सामना झाल्यानंतर केलेल्या कृतीमुळे तो सोशल मीडियावर चर्चेत आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये असा दावा केला जात आहे की, मुंबईच्या पराभवानंतर टिम डेव्हिड डगआऊटमधून मधले बोट दाखवताना दिसून आला, पण हा व्हिडीओ मुंबई इंडियन्सविरूद्धच्या सामन्यानंतरचा आहे की नाही, हे स्पष्ट झालेले नाही, मात्र टिम डेव्हिडने असा इशारा करणे चुकीचे असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com